अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिद्ध

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १८९ । बुधवार २२ एप्रिल २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com



**'सहजयोग'**
**भाग ३४**

जगातल्या पाठीवर कुठंही चर्चिला गेलेला नाही जितका आपल्या भारत वर्षात झालेला आहे कारण हिंदुस्थान ज्याला आपण पूर्वी भारतवर्ष म्हणत होतो, हि एक योग भूमि आहे. बाकी सगळ्या भोग भूमि आहेत. हिच एक योग भुमि आहे आणि म्हणून इथे फार मोठमोठ्या प्रवृत्तींनी म्हटलं पाहिजे किंवा देवांनी अवतार घेतलेले आहेत...आपल्या शास्त्रांमध्ये कुंडलिनीबद्दल इतकं सुंदर वर्णन दिलेलं आहे. म्हणजे हिंदू शास्त्र म्हणण्यापेक्षा, भारतातल्या लोकांना त्याचं जेवढं ज्ञान झालेलं आहे ते कुणालाही सबंध पृथ्वी लोकांत नाही झालं. तस

ब्राह्मणत्वाचे नाटक करता येत नाही. हे असलीयत आहे, खरी गोष्ट आहे. असायला पाहिजे,ते एक अस्तित्व आहे. जसा पक्षी दोनदा जन्माला पावतो तसाच मनुष्य सुध्दा दोनदा जन्माला पावतो. हे सर्व धर्माच्या लोकांनी सांगितलेलं आहे. गुरु तोच जो तुमच्यापेक्षा वर जाऊन आणि ज्याला आत्मसाक्षात्कार देता आला पाहिजे. १६ सप्टेंबर १९७३(पुणे) अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org ८८७१५१९१९१ सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

**विशेष संपादकीय...**
करण नवले

## त-न-पुरे : तडजोड की राजकीय अपरिहार्यता?

अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात राहुरी-नगर-पाथर्डी या मतदारसंघाला नेहमीच वेगळे महत्त्व राहिले आहे. सहकार, सत्ता आणि संघर्ष या तिन्ही आघाड्यांवर येथील राजकारण तापलेले असते. मात्र, माजी आमदार आणि माजी राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे यांनी पोटनिवडणुकीच्या निमित्ताने जी 'नरो वा कुंजरो वा' भूमिका घेतली, त्याने राजकीय विश्लेषकांच्या भुवया उंचावल्या आहेत. शरद पवार यांच्यासारखा खंबीर पाठीराखा आणि जयंत पाटील यांच्यासारख्या अनुभवी मामांची साथ असतानाही, तनपुरे यांनी मैदानातून घेतलेली माघार ही केवळ राजकीय रणनीती आहे की एखाद्या छुप्या दबावाचा परिणाम, हा आता जिल्ह्यात चर्चेचा मुख्य विषय बनला आहे. प्राजक्त तनपुरे यांना राजकारणाचे बाळकडू त्यांचे वडील, माजी खासदार प्रसादराव तनपुरे यांच्याकडून मिळाले. प्रसादराव तनपुरे यांनी जिल्ह्याच्या राजकारणात आपली एक स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. अनेक दशके त्यांनी या भागात भाजप आणि विशेषतः विखे-कर्डिले गटाशी दोन हात केले. तनपुरे कुटुंबाची ताकद ही त्यांच्या कट्टर समर्थकांमध्ये आहे, ज्यांनी पिढ्यानपिढ्या भाजपच्या विरोधात संघर्ष केला. प्राजक्त तनपुरे यांनी २०१४ च्या पराभवानंतर २०१९ मध्ये शिवाजीराव कर्डिले यांचा पराभव करून हा गड पुन्हा खेचून आणला आणि महाविकास आघाडी सरकारमध्ये मंत्रिपदही भूषवले. मात्र, आजच्या बदलत्या परिस्थितीत त्यांच्या भूमिकेने वडिलांनी कमावलेला संघर्षाचा वारसा धूसर होतोय की काय, अशी शंका उपस्थित होत आहे. पोटनिवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल न करणे आणि भाजपला छुप्या पद्धतीने रान मोकळे करून देणे, हे तनपुरे यांच्या समर्थकांच्या पचनी पडणारे नाही. जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात चर्चा आहे की, तनपुरे यांचे हात नेमके कोणत्या दगडाखाली अडकले आहेत? तनपुरे सहकारी साखर कारखान्याची सध्याची स्थिती आणि त्यांच्यावर असलेल्या विविध चौकशांचे फेरे, हे या भूमिकेमागचे मुख्य कारण असल्याचे बोलले जाते. (पान २ वर)

# मी संघर्षयोद्ध्याची सहचारिणी...

## येसूबाईप्रमाणे लढेन, अहिल्यादेवींप्रमाणे कारभार करेन!



**बारामतीच्या मैदानातून सुनेत्रा पवारांचा विश्वास**



**...तर आपण करंटे ठरू**

**बारामती येथील सभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अजित पवारांच्या आठवणींना उजाळात देत सुनेत्रा वहिनींना रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी करण्याचं आवाहन बारामतीकरांना केलं. बारामतीची आजची सांगता सभा म्हणजे अजित दादांच्या स्मृतीचा हा यज्ञ सुरू आहे, या यज्ञात आपली आहुती टाकली नाही तर मनात काहीतरी हुर हुर राहिली असती. त्यामुळेच, दादांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आम्ही इथं आलोय. सुनेत्रा वहिनींना सर्वाधिक रेकॉर्ड ब्रेक मतांनी विजयी करत, बारामतीकरांनी आपल्या मतांची आहुती या स्मृतीयज्ञात द्यायची आहे, नाहीतर आपण करंटे ठरू, असे म्हणत देवेंद्र फडणवीसांनी भावनिक आणि तितकंच जबाबदारीचं वक्तव्य केलं.**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** दादा जरी गेले असले तरी त्यांची स्वप्ने अजूनही जिवंत आहेत, तीच स्वप्न पूर्ण करण्याचं काम मी करेन, बारामतीकरांच्या विश्वासाला कधीही तडा जाऊ देणार नाही असं वक्तव्य सुनेत्रा पवार यांनी केलं. मी संघर्षयोद्ध्याची सहचारिणी आहे. येसूबाई जशा लढल्या तशी लढेन, अहिल्यादेवींनी जसा कारभार केला तसा कारभार करेन. सर्वांना न्याय देण्याचं काम करेन असा विश्वास सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केला.

बारामती पोटनिवडणुकीची सांगता सभा मंगळवारी पार पडली. यावेळी अजित पवारांच्या आठवणीत सुनेत्रा पवार भावूक झाल्याचं दिसून आलं. या सांगता सभेला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादीचे प्रमुख नेते आणि खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. बारातमीसाठी २३ एप्रिल रोजी मतदान पार पडणार आहे.

आपल्या सांगता सभेच्या भाषणावेळी सुनेत्रा पवार या भावुक झाल्याचं दिसून आलं. आपल्या भाषणात सुनेत्रा पवार म्हणाल्या की, दादा जरी गेले तरी त्यांची स्वप्न अजूनही जिवंत आहेत. दादांची जागा कुणीच घेऊ शकत नाही. मात्र त्यांच्या विचाराचा वारसा मी पुढे घेऊन जाणार आहे. बारामतीकर जनता माझ्या पाठीशी आहे, तोपर्यंत मी खचणार नाही. मागे हटणार नाही. मी एका संघर्षयोद्ध्याची सहचारिणी आहे. येसुबाई जशा लढल्या, तसेच मी लढेन. अहिल्यादेवींनी जसा कारभार केला, तसाच कारभार करेन. ही माती माझी आहे, त्यामुळे दादांप्रमाणे तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा, त्याला कधीच तडा जाऊ देणार नाही. आपण लाखोंचा पोशिंदा गमावला. दादांचं स्वप्न आणि त्यांच्या कर्तव्याची जाणीव, त्यांच्या पश्चात माझ्यावर आलेल्या जबाबदारीची जाणीव आहे. त्याचा शिवधनुष्य मी उचलून तुमच्यासमोर आले आहे. दादांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाईन, असं सुनेत्रा पवार म्हणाल्या. (पान ४ वर)

# 'एनसीडीसी'चा सात साखर कारखान्यांना दणका!

## संग्राम थोपटेंना मोठा फटका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** सलग तीन वर्षे बंद असलेल्या आणि आर्थिक अडचणीतील सहकारी कारखान्यांना कर्ज देण्यास राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने (एनसीडीसी) नकार दिला आहे. राज्य सरकारने एकूण १४ कारखान्यांना कर्ज देण्यासाठी एनसीडीसीकडे प्रस्ताव दाखल केला होता.

त्यापैकी सात कारखान्यांना तुर्तास कर्ज मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे कारखाना वाचविण्यासाठी काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केलेल्या माजी आमदार संग्राम थोपटे यांनाही या निर्णयाचा फटका बसला आहे.

राज्य सरकारच्या वतीने एकूण १४ कारखान्यांना कर्ज देण्याचा प्रस्ताव एनसीडीसीला पाठविला होता. त्यापैकी श्री भोगावती सहकारी साखर कारखाना लि. (कोल्हापूर), श्री दूधगंगा वेदगंगा सहकारी साखर कारखाना (कोल्हापूर), तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना (कोल्हापूर), क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना (सांगली), मुळा सहकारी साखर कारखाना (अहिल्यानगर), अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना (सातार) आणि लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना (बीड) या कारखान्याचे कर्ज प्रस्ताव मंजूर झाले आहेत.

**'या' कारखान्यांचे प्रस्ताव फेटाळले**

कारखान्यांचे भागभांडवल कमी असणे. आर्थिक अनियमितात. सतत तीन वर्षे आर्थिक तोटा. यापूर्वी एनसीडीसीकडून कर्ज घेऊनही सुधारणा न होणे. कर्ज परतफेडीचे प्रमाण कमी असणे. कारखाना भाड्याने चालविण्यास देणे. एफआरपी रक्कम आणि शासनाची थकबाकी असणे, आदी कारणांमुळे रामेश्वर सहकारी साखर कारखाना लि. जालना (१०६.०८ कोटी), श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना लि. धाराशिव (७२ कोटी), रावसाहेबदादा पवार घोडगंगा सहकारी साखर कारखाना, पुणे (१८४.१२ कोटी), श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखाना, सोलापूर (१९९.९४ कोटी), कर्मयोगी कुंडलिकराव जगताप पाटील (पान ४ वर)

**पुन्हा कर्ज प्रस्ताव पाठविणार : सहकार मंत्री**

**राज्यातील सहकारी साखर कारखान्यांची गाळप क्षमता वाढविण्यासाठी. आर्थिकदृष्ट्या अडचणीत आलेल्या सहकारी कारखान्यांना खेळते भांडवल पुरविण्यासाठी. साखर कारखान्यांमध्ये इथेनॉल किंवा सह - उत्पादन प्रकल्प उभारण्यासाठी आणि आधुनिकीकरणासाठी एनसीडीसी दीर्घ मुदतीचे कर्ज देते. काही कारखान्याच्या कर्ज प्रस्तावात त्रुटी आहेत. त्या त्रुटी दूर करून पुन्हा कर्ज प्रस्ताव पाठविले जातील, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.**

# 'समता'ची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न हाणून पाडा!

**सर्व रेकॉर्ड्स सुरक्षित : भट्टड**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** समता नागरी सहकारी पतसंस्था गेल्या ४० वर्षांपासून सहकार क्षेत्रात विश्वासार्ह सेवा देत असून लाखो ग्राहकांचा विश्वास संपादन केला असता काही विघ्नसंतोषी लोक संस्थेला जाणून बुजून बदनाम करण्यासाठी प्रयत्न करत असून संस्थेचे सर्व रेकॉर्ड सुरक्षीत असून अशा प्रकारच्या अफवाना बळी पडू नये असे आवाहन समताचे जनरल मॅनेजर सचिन भट्टड यांनी केले आहे .

संस्थेत दररोज मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार होत असल्याने संबंधित सर्व कागदपत्रे व रेकॉर्ड व्यवस्थित जतन करून ठेवणे आवश्यक असते. संस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या परिसरात पूरस्थितीचा धोका असल्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून काही महत्त्वाचे रेकॉर्ड शहरातील २ ते ३ सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहेत.

यामध्ये ग्राहकांचे अकाउंट ओपनिंग फॉर्म, कर्ज फाइल्स, छापील स्टेशनरी तसेच इतर आवश्यक कागदपत्रांचा समावेश आहे. निवारा येथेही अशाच प्रकारचे रेकॉर्ड रूम तयार करण्यात आले असून काही रेकॉर्ड तेथे सुरक्षित ठेवण्यात आले आहेत. मागील वर्षी म्हणजे २८ व २९ सप्टेंबर २०२५ रोजी आलेल्या पुरामुळे मुख्य कार्यालयात पाणी शिरल्याने काही कागदपत्रे तातडीने निवारा येथील रेकॉर्ड रूममध्ये स्थलांतरित करण्यात आली होती. सध्या या ठिकाणी काही रेकॉर्ड अद्याप सुरक्षित स्थितीत ठेवलेले आहेत. त्यात काहीही आक्षेपार्ह रेकॉर्ड नाही. ही सर्व कागदपत्रे स्कॅन करून सॉफ्टवेअर मध्ये

देखील जतन केले जातात व नंतर रेकॉर्ड रूम मध्ये ही ठेवली जातात. दरम्यान, काही अपप्रवृत्तींनी संस्थेची प्रतिमा मलिन करण्याच्या उद्देशाने चुकीच्या अफवा पसरविण्याचा प्रयत्न सुरू केल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर संस्थेचे जनरल मॅनेजर सचिन भट्टड यांनी ग्राहक व सभासदांना आवाहन केले आहे की, अशा निराधार अफवांवर विश्वास ठेवू नये आणि संस्थेवरील विश्वास कायम ठेवावा. समता पतसंस्था नेहमीच पारदर्शक व जबाबदारीने कार्य करत असून ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# पोटनिवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

## ३ लाख ३३ हजार ५४५ मतदार बजावणार मतदानाचा हक्क

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** येत्या २३ एप्रिल होणाऱ्या राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा पूर्णपणे सज्ज झाली असून यावेळी एकूण ३ लाख ३३ हजार ५४५ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदारांना सुरक्षित व निर्भयपणे मतदान करता यावे यासाठी सर्व ३७४ मतदान केंद्रांवर आवश्यक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. यंदाच्या निवडणुकीतील एक अत्यंत महत्त्वाचा व नाविन्यपूर्ण बदल म्हणजे, मतदान कर्मचाऱ्यांना ईव्हीएम व साहित्यासाठी मुख्यालयात एकत्र येण्याची गरज नसून, त्यांना नेमून दिलेल्या मतदान केंद्रांवरच थेट साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. सर्व मतदान केंद्रावर वेबकॉस्टिंग ची नजर असून यावेळी कडे कोट बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे



जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, उप जिल्हा निवडणूक अधिकारी दत्तात्रय कवितके यांच्या मार्गदर्शनाखाली व निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव यांच्या देखरेखीखाली या निवडणूक प्रक्रियेचे अत्यंत सूत्रबद्ध नियोजन करण्यात आले आहे.

मतदान केंद्रावरील वेळ व श्रमाची बचत व्हावी यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. सर्व मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांनी २२ एप्रिल २०२६ रोजी सकाळी थेट त्यांना नेमून दिलेल्या मतदान केंद्रांवरच पोहोचायचे आहे. ईव्हीएम मशीन आणि इतर सर्व आवश्यक मतदान साहित्य क्षेत्रीय अधिकाऱ्यांमार्फत (Sector Officers) थेट या मतदान केंद्रांवरच पोहोच केले जाणार आहे. तसेच, मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर हे साहित्य पुन्हा केंद्रावरूनच क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडे जमा करावयाचे आहे.

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक यांच्यामार्फत ३६ पोलीस अधिकारी, ७०८ पोलीस कर्मचारी आणि ३९१ होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दल (CISF) ची एक तुकडी आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाची (CRPF) एक प्लाटून सुरक्षेसाठी पाचारण करण्यात आली आहे. संपूर्ण मतदान प्रक्रियेत पारदर्शकता राहावी यासाठी सर्व ३७४ (पान ४ वर)

# पशुसंवर्धन विभागाकडून गोपालकांना मिळणार तीन लाखांचे अर्थसहाय्य

## 'किसान क्रेडिट कार्ड'द्वारे शेतकऱ्यांना मिळणार आर्थिक बळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नाशिक :** शेतीला जोडधंदा म्हणून पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना पशुसंवर्धन विभागाकडून 'किसान क्रेडिट कार्ड'द्वारे तीन लाखांपर्यंतचे अर्थसाहाय्य दिले जाणार आहे. या योजनेद्वारे शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळणार असल्याची माहिती पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी दिली.

पशुपालन, शेळी, मेंढीपालन, कुक्कुटपालन आणि वराहपालन करणाऱ्या शेतकऱ्यांना या योजनेंतर्गत त्यांच्या पशुधनाच्या संगोपनासाठी व दैनंदिन खर्चासाठी (खेळते भांडवल) आकर्षक व्याज सवलतीसह कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. जास्तीत जास्त पात्र पशुपालकांनी आपल्या जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्याशी किंवा दूध संस्थेशी संपर्क साधून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहआयुक्त डॉ. देवेंद्र जाधव यांनी केले आहे.

ज्या शेतकऱ्यांकडे किसान क्रेडिट कार्ड नाही, त्यांना १ लाख ६० हजार रुपयांपर्यंतचे कर्ज विनातारण उपलब्ध होणार आहे. दूध संस्थेची हमी असल्यास ही मर्यादा ३ लाख रुपयांपर्यंत वाढविता येणार आहे, तसेच ज्यांच्याकडे आधीच किसान क्रेडिट कार्ड आहे, अशा शेतकऱ्यांनाही ३ लाख रुपयांपर्यंतची पतमर्यादा वाढवून घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.

कर्जाचा मूळ व्याजदर ९ टक्के असला, तरी नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना केंद्र शासनाकडून ३ टक्के व राज्य शासनाच्या शासननिर्णयानुसार ४ टक्के अशी एकूण ७ टक्क्यांपर्यंत व्याज सवलत मिळते. याशिवाय बँकांकडून २ टक्के व्याज सवलत दिली जात असल्याने पात्र आणि नियमित परतफेड करणाऱ्या पशुपालकांना प्रत्यक्षात शून्य टक्के व्याजदराचा लाभ घेता येतो, असेही त्यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

**सर्व पशुपालक पात्र ठरणार**

**जिल्हास्तरावर 'पशुसंवर्धन उपआयुक्त' हे सनियंत्रण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. या मोहिमेसाठी दूध सोसायटी, दूध संघ किंवा दूध उत्पादक कंपनीचे सभासद असलेले आणि अद्याप या योजनेचा लाभ न घेतलेले सर्व पशुपालक शेतकरी पात्र ठरणार आहेत.**



# औरंगपुरा झाले संभाजीपेठ!

## महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत बहुमताने निर्णय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संभाजीनगर :** शहराचे मध्यवर्ती ठिकाण आणि ऐतिहासिक ओळख असलेल्या औरंगपुरा परिसराचे नाव आता अधिकृतपणे संभाजीपेठ झाले आहे. महापालिकेच्या सोमवारी (दि.२०) पार पडलेल्या सर्वसाधारण सभेतील चर्चेनंतर बहुमताने हा महत्त्वाचा निर्णय मंजूर करण्यात आला. तत्पूर्वी संभाजीपेठ असे अधिकृत नाव देण्याच्या प्रस्तावावरून सभेत जोरदार वादंग झाले. या प्रस्तावाला उबाठाचे नगरसेवक राशिद मामू यांनी तीव्र विरोध दर्शविला. अखेर चर्चे अंती प्रस्तावाला बहुमताने मंजुरी मिळाली.

शहरातील मुख्य बाजारपेठ असलेल्या औरंगपुरा परिसराचे नामकरण संभाजीपेठ असे करावे, असा प्रस्ताव स्थायी समितीचे सभापती अनिल मकरिये यांनी सोमवारी सभागृहात मांडला. अनेक वर्षांपासून नागरिक या भागाला संभाजीपेठ म्हणून संबोधत असल्याचा मुद्दा मांडत त्यांनी प्रस्तावाला मान्यता देण्याची मागणी केली. मात्र या प्रस्तावावर शिवसेना (उबाठा) चे नगरसेवक रशिद मामू यांनी आक्षेप घेतला. शहराच्या विकासात योगदान देणाऱ्या अन्य नेत्यांची नावे विचारात घ्यावीत, असे मत त्यांनी मांडले. शहरातील औरंगपुरा परिसराला गेल्या अनेक वर्षांपासून संभाजीपेठ म्हणून ओळखले जाते. व्यापारी, नागरिक तसेच स्थानिकांमध्ये हे नाव प्रचलित असल्याने अधिकृत नामकरणाची मागणी सातत्याने होत होती. महापालिकेच्या निर्णयामुळे या मागणीला अखेर शिक्कामोर्तब झाले.



**सभागृहात उबाठा गटात मतभेद**

नामकरणाच्या मुद्द्यावर शिवसेना (उबाठा) नगरसेवकांमध्ये मतभेद स्पष्ट दिसून आले. एका बाजूला रशिद मामू यांनी विरोध दर्शविला, तर दुसरीकडे सचिन खैरे यांनी उघडपणे समर्थन केले. त्यामुळे आगामी राजकीय समीकरणांवर याचे परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## संपादकीय

# त-न-पुरे : तडजोड की राजकीय अपरिहार्यता?

ईडी आणि सीबीआयच्या कारवाईच्या भीतीने महाराष्ट्रातील अनेक दिग्गज नेत्यांनी आपली निष्ठा बदलली, तिथे प्राजक्त तनपुरे यांनी घेतलेली 'अघोषित तटस्थता' ही त्याच मालिकेतील एक भाग तर नाही ना? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेपूर्वी त्यांनी घेतलेली गुप्त बैठक आणि त्यानंतर मौन बाळगणे, हे बरेच काही सांगून जाते.

कोणत्याही नेत्याची ताकद ही त्याच्या कार्यकर्त्यांवर अवलंबून असते. राहुरीमध्ये तनपुरे समर्थकांनी गेली अनेक वर्षे भाजपच्या स्थानिक नेतृत्वाशी, विशेषतः विखे आणि कर्डिले गटाशी तीव्र संघर्ष केला आहे. उद्या होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्ये याच कार्यकर्त्यांना पुन्हा भाजपच्या विरोधात उभे ठाकायचे आहे. अशा वेळी, पोटनिवडणुकीत आपल्या नेत्याने भाजपच्या उमेदवाराला 'वाकओव्हर' देणे, हे कार्यकर्त्यांच्या मनोबलावर घाला घालणारे आहे. नेत्याची सेटिंग झाली, पण आमचं काय? हा कार्यकर्त्यांचा सवाल अत्यंत रास्त आहे. जर आज भाजपशी हातमिळवणी केली, तर उद्या कोणत्या तोंडाने त्यांच्यावर टीका करायची, हा यक्षप्रश्न समर्थकांपुढे उभा राहिला आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी तनपुरेंच्या पाठिंब्याची आम्हाला गरज नाही, त्यांनी अर्ज न भरणे हाच पाठिंबा आहे, असे म्हणून तनपुरे यांच्या भूमिकेतील हवाच काढून घेतली. त्यातच तनपुरे यांचे चुलते मुख्यमंत्री फडणवीस यांच्या व्यासपीठावर उपस्थित राहणे, हे या कुटुंबात पडलेली राजकीय फूट किंवा सोयीचे राजकारण अधोरेखित करते. भगवी टोपी आणि भगवे उपरणं घालून फिरणारे प्राजक्त तनपुरे ऐनवेळी मी राष्ट्रवादीतच आहे असे म्हणतात, तेव्हा त्यातील संदिग्धता अधिकच गडद होते.

राजकारणात 'स्टँड' घेण्याला महत्त्व असते. शरद पवारांच्या पक्षात राहून भाजपला मदत करणे, हे दुहेरी धोरण फार काळ टिकणारे नसते. प्राजक्त तनपुरे यांनी घेतलेली ही भूमिका त्यांना भविष्यात महागात पडू शकते. जर त्यांनी भविष्यात भाजपमध्ये प्रवेश केला, तर त्यांच्या मूळ मतदारांची नाराजी त्यांना सहन करावी लागेल आणि जर ते राष्ट्रवादीतच राहिले, तर भाजप त्यांना पुन्हा सत्तेच्या बळावर लक्ष्य करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

थोडक्यात सांगायचे तर, प्राजक्त तनपुरे यांनी तूर्तास स्वतःला वाचवण्यासाठी ही भूमिका घेतली असावी, असा अंदाज बांधला जात आहे. मात्र, या प्रक्रियेत त्यांनी आपल्या कट्टर कार्यकर्त्याला वाऱ्यावर सोडले आहे. राजकारणात 'वेळ' महत्त्वाची असते, पण 'तत्त्व' त्याहूनही श्रेष्ठ असते. तनपुरे यांनी घेतलेली 'नरो वा कुंजरो वा' भूमिका ही कदाचित त्यांना तात्पुरता दिलासा देईल, पण राहुरीच्या मातीत गेली अनेक वर्षे जो संघर्षाचा वसा त्यांनी जोपासला होता, त्याला मात्र या भूमिकेने मोठा तडा गेला आहे. आगामी काळात ही 'सेटिंग' त्यांना सत्तेच्या जवळ नेते की जनतेपासून लांब नेते, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

# एस. के. सोमैय्याचे विद्यार्थी लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात चमकले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** रयत शिक्षण संस्थेच्या श्रीरामपूर येथील एस के सोमय्या प्राथमिक विद्यामंदिरचे राज्यस्तरीय लक्ष्यवेध प्रज्ञाशोध परीक्षेत राज्यात ११ जिल्ह्यात २४ केंद्रात २२ अशा एकूण ५७ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत घवघवीत यश मिळवले व आपले स्थान पटकावले आहे.नुकताच अहिल्यानगर येथे पारितोषिक वितरण समारंभ दिमाखात पार पडला त्यातील यशवंत गुणवंत विद्यार्थी यांचे प्रेरणास्थान मॅनेजिंग कौन्सिल सदस्यां मीनाताई जगधने ,मुख्याध्यापिका सोनाली पैठणे ,व स्पर्धा परीक्षा प्रमुख अनिता चेडे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व सर्व मार्गदर्शक विषय शिक्षक व वर्गशिक्षक या टीमचे अभिनंदन केले. राज्य गुणवत्ता यादीत इयत्ता पहिली सर्वज्ञ भोगे १४० गुण मिळवून राज्यात सहावा तर अर्णवी मोरे १३८ गुण राज्यात सातवी ,इयत्ता २ री –कैवल्य मपवार २४४ गुण चौथा क्रमांक पटकावला ,इयत्ता ३ री –प्रज्वल पिंगळे २९४ गुण राज्यात तिसरा, आरुष कुन्हे २९० गुण राज्यात पाचवा , अभिज्ञा फुटाणे २८८ गुण राज्यात सहावी राजवीर रुपनर २८६ गुण राज्यात सातवा ,इयत्ता चौथी –वेदांत लबडे २८८ गुण राज्यात पाचवा विराट पाटील २८६ गुण राज्यात सहावा , इयत्ता सातवी – आयुष टेकाळे २८० गुण राज्यात पाचवा त्याचप्रमाणे जिल्ह्यात एकूण २४ तर केंद्रात बावीस विद्यार्थी झळकले आहेत.या सर्व विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.




# नांमकातुन पाणी सोडले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** वैजापुर व गंगापुर तालुक्यातील सिंचन व पिण्याच्या पाण्यासाठी नांदुर मधमेश्वर एक्सप्रेस कालव्यातून सोमवारी सायंकाळी चार वाजता उन्हाळी आवर्तनसाठी ३०० क्युसेकने पाणी सोडण्यात आले. पाण्याचा विसर्ग टप्या टप्याने वाढवून आठशे क्युसेक करणार असल्याचे जलसंपदा विभागातर्फ सांगण्यात आले. हे पाणी मंगळवारी गंगापूर तालुक्याच्या हद्दीत दाखल होणार असुन पायथा ते माथा या नियमानुसार आधी गंगापूर तालुक्यातील गावांना पाण्याचे वितरिकेद्वारे वाटप करण्यात येईल. वैजापुर व गंगापुर तालुक्यातील शेतकऱ्यांना पिण्यासाठी व शेतीसाठी उन्हाळी आवर्तन सोडण्यात आले. १५ दिवस हे आवर्तन सुरू राहणार आहे. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे. परिसरातील शेतकऱ्यांनी पाणी मागणी अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. कालव्यात मुबलक प्रमाणात पाणीसाठाअसून मे महिन्यात देखील एक पाणी आवर्तन सोडण्यात येणार असल्याचे कालवा विभागाच्या वतीने सांगण्यात आले

# संगमनेरला महिला शिवसेना महायुतीचे बसस्थानकावर निदर्शने

## विधेयकाला विरोध करणाऱ्या विरोधात घोषणाबाजी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** लोकसभेमध्ये मांडण्यात येणाऱ्या नारीशक्ती विधेयकाला विरोध केले असल्याच्या निषेधार्थ संगमनेर येथे शहर महिला शिवसेना महायुतीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात आले.
काँग्रेसचे युवा नेते राहुल गांधी यांच्या विरोधात महिलांनी जोरदार घोषणा बाजी करत बसस्थानक परिसर चांगलाच दणाणून सोडला होता

संगमनेर शहर महिला शिवसेना महायुतीच्या वतीने बसस्थानक परिसरात महिला एकत्र आल्या. या वेळी आंदोलनकर्त्या महिलांनी हातात फलक घेऊन नारीशक्तीचा अपमान, अजिबात सहन केला जाणार नाही, महिलांच्या हक्कांसाठी लढा देऊ अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. महिला सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जाणारे हे विधेयक असून, त्याला विरोध करणे म्हणजे महिलांच्या प्रगतीला अडथळा आणण्याचा प्रयत्न असल्याचाआरोप आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ नगरसेविका साक्षी सूर्यवंशी संगीता पुंड यांनी करत देशातील महिलांना राजकीय व सामाजिक स्तरावर अधिक संधी मिळाव्यात, यासाठी नारीशक्ती विधेयक अत्यावश्यक आहे. मात्र, काही विरोधी पक्षाच्या नेत्यांकडून या विधेयकाला विरोध होत असल्याने विधेयकाला विरोध करणाऱ्यांचा निषेध करण्यात आला. संगमनेर शहरशिवसेनेच्या वतीने बस स्थानकावर आंदोलन करण्यात आले. यावेळी लीलावती काळे सोनाली बोटवे, पुनम दायमा, संगीता पुंड , सपना जाधव, पूजा आरगडे, आरती पगारे, शोभा सूर्यवंशी, राधा सूर्यवंशी, अरुणा सूर्यवंशी, कोमल सातपुते, स्वाती मुंडलिक, शिवाली सूर्यवंशी, दिपाली वाव्हळ, शिवज्ञा आरगडे, जान्हवी जांबुकर यांच्यासह महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या.

> महिला घर, गाव व देश सांभाळते त्यांना राजकारणात अधिक स्थान मिळायला हवे हा नक्कीच योग्य आणि महत्त्वाचा मुद्दा आहे. राष्ट्र महापुरुषांचे आदर्श विचार घेऊन महिला शिक्षण, प्रशासन, उद्योग, क्रीडा अशा सर्व क्षेत्रांत पुढे जात आहे हे काँग्रेस पक्षाला पाहवत नाही म्हणून काँग्रेसच्या नेत्यांनी नारी शक्ती विधेयकाला खोडा घालत आहे त्यांचा राजकारणातही सहभाग वाढणे गरजेचे आहे
>
> **सौ नीलम खताळ**
> **सामाजिक कार्यकर्त्या**




# राज्यात पाचवी, जिल्ह्यात प्रथम

## अवनी ब्राम्हणेचा मान्यवरांच्या हस्ते गौरव

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव |** लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा २०२६ मध्ये भालेरायवाडी, हनुमंतगाव (ता. राहता) येथील आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची विद्यार्थीनी अवनी प्रसाद ब्राम्हणे हिने राज्यात पाचवा तर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत उज्ज्वल यश संपादन केले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून तिचे कौतुक होत आहे.

लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा परीक्षा २०२६ च्या पारितोषिक वितरण सोहळ्यात अवनीचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. शिक्षण संचालक दिनकर टेमकर होते. त्यांच्या हस्ते अवनीला ट्रॉफी, प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी शिक्षण सहसंचालक रमाकांत काटमोरे तसेच अतिरिक्त जिल्हाधिकारी (पुणे) ज्योती कावरे यांच्या शुभहस्ते कार्यक्रम पार पडला.

प्रमुख अतिथी म्हणून प्रांताधिकारी (अहमदनगर) सुधीर पाटील, पोलीस उपअधीक्षक शिरीश वमने, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालक रमेश कसार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे, माजी शिक्षणाधिकारी रामदास हराळ आणि जिल्हा समाजकल्याण अधिकारी महादेव शिंदे यांनी उपस्थित राहून अवनीच्या यशाचे कौतुक केले. मान्यवरांनी तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत स्पर्धात्मक परीक्षांसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याचे मार्गदर्शन केले.

अवनीच्या या यशामागे तिच्या पालकांचे सहकार्य, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि तिची जिद्द व चिकाटी यांचा मोठा वाटा असल्याचे सांगण्यात आले. अत्यंत लहान वयात मिळवलेली ही कामगिरी इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

या यशामुळे आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भालेरायवाडी तसेच हनुमंतगाव परिसराचा नावलौकिक राज्यभर झळकला आहे. शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवृंद, पालक आणि ग्रामस्थांनी अवनीचे अभिनंदन करून तिच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.




# उंबरी बाळापुर येथे संयुक्त जयंती महोत्सव उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी ;** संगमनेर तालुक्यातील उंबरी बाळापूर येथे रविवारी (दि. १९) छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता अहिल्यादेवी होळकर, क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, वीर एकलव्य आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

यावेळी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि वीर एकलव्य यांच्या स्मारकांचा नियोजित भूमिपूजन सोहळा पार पडला. याप्रसंगी ज्येष्ठ नेते रामभाऊ भुसाळ, पंचायत समितीचे माजी सदस्य सुरुनाथ उंबरकर, शेतकी संघाचे संचालक भाऊसाहेब खेमनर, भाजपचे आश्वी मंडळ अध्यक्ष गोकुळ दिघे, भागवत उंबरकर, सरपंच सौ. अर्चना भुसाळ, पोलीस पाटील वैशाली भगवान मैड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष अशिष शेळके, वीर एकलव्य स्मारक समितीचे अध्यक्ष अनिल बर्डे, रिपाइंचे ग्रामशाखा अध्यक्ष विजय शेळके, ॲड. रवींद्र शेळके आदिंसह ग्रामस्थ उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात अकोले तालुक्यातील सुप्रसिद्ध आदिवासी नृत्य पथकाने केलेल्या लक्षवेधी सादरीकरणाने झाली. त्यानंतर महामानवांच्या काढलेल्या प्रतिमांची सवाद्य भव्य मिरवणूकीत पारंपारिक वाद्यांच्या गजरात आणि नृत्याच्या तालावर अवघे गाव थिरकले. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. तर, जय जिजाऊ, जय शिवराय , वीर एकलव्य, राजमाता अहिल्यादेवी होळकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि जय भीम''च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. याआधी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत वंदन करण्यात आले.

मिरवणुकीनंतर अभिवादन सभा आणि उपस्थित जनसमुदायासाठी 'गोडधोड' स्नेहभोजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. यानंतर सुप्रसिद्ध गायक अविनाश कदम यांच्या 'भीम गीतांच्या' बहारदार कार्यक्रमाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. तसेच गाण्यावर ताल देखील धरायला भाग पाडले. यावेळी तरुणाईसह महिला आणि मुलींची उपस्थिती देखील लक्षणीय होती.



# रमेश पन्हाळे यांच्यावर हल्ल्याचा निषेध

## अवैध वाळू उपसा विरोधात ग्रामस्थ आक्रमक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी :** राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील ग्रामपंचायत सदस्य व माजी उपसरपंच रमेश भीमराज पन्हाळे यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा सोनगाव, सातव, धानोरे पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी तीव्र निषेध केला. पंचक्रोशी ग्रुप सोसायटीसमोर आयोजित सर्वपक्षीय सभेत ग्रामस्थांनी एकत्र येत गावातील कायदा-सुव्यवस्थेबाबत चिंता व्यक्त केली आणि दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.

शुक्रवारी रात्री सुमारे नऊच्या सुमारास सहा जणांनी जुन्या वादाच्या पार्श्वभूमीवर पन्हाळे यांना शिवीगाळ, दमदाटी करत मारहाण केली. यावेळी त्यांच्या खिशातील सुमारे २५ हजार ४०० रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याचा आरोप आहे. पूर्वी दाखल केलेल्या गुन्ह्याचा राग मनात ठेवून हा हल्ला करण्यात आल्याचे समोर येत आहे.

> **पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांची दखल**
>
> या घटनेची पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी गांभीर्याने दखल घेत पन्हाळे यांच्या घरी भेट देऊन माहिती घेतली. आरोपींचा तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याच्या सूचना त्यांनी पोलिसांना दिल्या.

या घटनेच्या निषेधार्थ झालेल्या सभेत ग्रामस्थांनी गुंडगिरीविरोधात संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. प्रवरा नदीपात्रातील बेकायदा वाळू उपसा आणि अवैध धंद्यांमुळे गावात गुन्हेगारीला खतपाणी मिळत असल्याचा आरोप करण्यात आला. या प्रकारांना आळा घालण्यासाठी राजकारणापलीकडे जाऊन एकत्रितपणे लढा उभारण्याचे आवाहन करण्यात आले.

सभेत ॲड. आप्पासाहेब दिघे, प्रतापराव कडू, योगेश चोरमुंगे आदींनी मार्गदर्शन केले. बिफिन ताटे यांनी अवैध दारू विक्री व वाळू चोरीविरोधात ग्रामसभेत ठराव मंजूर करण्याची गरज व्यक्त केली, तर किरण कडू यांनी त्यास अनुमोदन देण्याचे आवाहन केले.

या वेळी प्रा. बाळासाहेब दिघे, प्रवरा सहकारी बँकेचे संचालक संतोष अंत्रे, वसंतराव डुकरे, कारभारी ताठे, मच्छिंद्र अंत्रे, नारायण धनवट, पाराजी धनवट, प्रमोद नालकर, योगेश पलघडमल, प्रकाश ताठे, राजेंद्र चोरमुंगे यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



# पेमाईदेवी यात्रोत्सवानिमित्त आ. खताळ दपत्यांकडून महाआरती

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** तालुक्यातील शिव संकल्प भुमी पेमगिरी येथील पेमाईदेवी मातेचा यात्रोत्सवनिमित्त . आमदार अमोल खताळ आणि पत्ती नीलम खताळ यांच्या हस्ते महापूजा होऊन आरती झाली आणि दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले आमदार अमोल खताळ आणि त्यांच्या पत्नी नीलम खताळ यांनी संकल्पभूमी पेमगिरी येथे उपस्थित राहून पेमाईदेवी मातेची विधीवत महापूजा केली. त्यानंतर त्यांनी महाआरती करून देवीचे आशीर्वाद घेतले. यावेळी त्यांनी परिसरातील नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यात्रोत्सवा च्या निमित्त गावात वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली होती या मिरवणुकीत आमदार खताळ यांनी सपत्नीक सहभाग घेऊन उत्साह वाढविला. मंदिर परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती. भाविकांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. स्थानिक ग्रामस्थ व मंदिर समितीच्या वतीने यात्रेचे सुयोग्य नियोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाला स्थानिक पदाधिकारी, ग्रामस्थ तसेच मोठ्या संख्येने महिला व युवक उपस्थित होते. पेमाईदेवी मातेच्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात हा यात्रोत्सव यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी संकल्प शिव संकल्प भूमी पेमगिरी येथील ग्रामस्थ व महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# संगमनेर मर्चंट बँकेच्या चेअरमन पदी सीए संजय राठी

## तर व्हा चेअरमनपदी रवींद्र पवार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** सभासद आणि ग्राहकांचा विश्वास संपादन केल्यामुळे संगमनेर मर्चंट बँकेची घोडदौड निरंतर सुरु असून संस्थेची आर्थिक स्थिती अत्यंत भक्कम आहे. शाखा विस्तार मोहिमेअंतर्गत नाशिकनंतर आता लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे बँकेची नवीन शाखा उघडली जाणार आहे अशी महत्त्वपूर्ण घोषणा बँकेचे नूतन चेअरमन सीए संजय राठी यांनी केली.

सोमवारी (ता.२०) बँकेच्या स्वामी विवेकानंद सभागृहात सहकार खात्याच्या वरिष्ठ अधिकार्यांच्या निरीक्षणाखाली चेअरमन व व्हाईस चेअरमनपदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी चेअरमनपदी सीए संजय राठी तर व्हाईस चेअरमनपदी रवींद्र पवार यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर करण्यात आले. या निवडीनंतर आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते.

यावेळी बँकेचे मार्गदर्शक व मावळते चेअरमन, उद्योगपती राजेश मालपाणी, मावळते व्हा.चेअरमन मधुसूदन नावंदर, संस्थापक दिवंगत ओंकारनाथ मालपाणी यांच्या पत्नी मातोश्री ललितादेवी मालपाणी आदी मान्यवर उपस्थित होते. निवडीनंतर राजेश मालपाणी यांच्या हस्ते नूतन चेअरमन संजय राठी यांचा, तर मधुसूदन नावंदर यांच्या हस्ते रवींद्र पवार यांचा सत्कार करण्यात आला.

आपल्या भाषणात सीए संजय राठी यांनी बँकेच्या प्रगतीचा आढावा घेताना सांगितले की, राजेशभाऊ मालपाणी यांच्या नेतृत्वाखाली बँकेने हीरक महोत्सवी वर्ष साजरे केले आहे. गेल्या ३० वर्षांपासून माझे या बँकेशी ऋणानुबंध आहेत. संस्थापक ओंकारनाथजींनी दिलेला पारदर्शकतेचा आणि काटकसरीचा वारसा आपण पुढे नेत आहोत. आज बँकिंग क्षेत्रात अमुलाग्र बदल झाले असून रिझर्व्ह बँकेची धोरणे बदलली आहेत. आता ग्राहकांचे राज्य असून स्पर्धेमुळे नफ्याचे प्रमाण केवळ एका टक्क्यावर आले आहे. आगामी काळ हा 'डोअर स्टेप बँकिंग' आणि 'डिजिटल बँकिंग'चा आहे. कार्यक्षम कर्मचारी वर्ग आणि संचालक मंडळाच्या साथीने आपण बँकेची प्रगती अधिक वेगवान करु असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मावळते चेअरमन राजेश मालपाणी यांनी बँकेच्या प्रवासाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. ते म्हणाले की, १९९० मध्ये संस्थापक ओंकारनाथजींच्या काळात बँकेने शंभर कोटींच्या संमिश्र व्यवसायाचा टप्पा गाठला होता. १९९६ मध्ये १०० कोटींच्या ठेवींचे उद्दिष्ट पूर्ण झाले आणि आता हीरक महोत्सवी वर्षात सर्वांच्या सहकार्याने एक हजार कोटींच्या व्यवसायाचा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण झाला आहे. त्यांनी आपल्या यशाचे श्रेय सर्व सहकारी आणि कर्मचार्यांना देताना, करते हो तुम कन्हैय्या, मेरा नाम हो रहा है... या ओळी उद्धृत करत कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी मातोश्री ललितादेवी मालपाणी यांनी बँकेच्या स्थापनेच्या वेळच्या हृदयस्पर्शी आठवणींना उजाळा दिला. मावळते व्हाईस चेअरमन मधुसूदन नावंदर यांनीही आपला कार्यकाळ सार्थ ठरल्याचे सांगत आभार मानले. या कार्यक्रमाप्रसंगी नरेंद्र चांडक, विवेक कासार, अमित पंडित, डॉ.संजय मालपाणी, संजय लाहोटी, श्रुती राठी, बापूसाहेब टाक, महेश वाकचौरे, सुधाकर जोशी, मनीष मालपाणी, गिरीश मालपाणी, जयवंत पवार आणि ओंकारनाथ भंडारी यांची भाषणे झाली.



हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# मालपाणी पुरस्कृत सामुदायिक विवाह सोहळा राज्याला दिशादर्शक : आ. खताळ

## एक्केचाळीस नवदाम्पत्यांचा मंगल परिणय

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : संगमनेर येथील मालपाणी उद्योग समूहाच्या पुढाकारातून आयोजित करण्यात येणारा सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा हा राज्यासाठी दिशादर्शक ठरत असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले. 'अक्षय्य तृतीया'च्या शुभमुहूर्तावर मालपाणी लॉन्स येथे पार पडलेल्या २९ व्या सामुदायिक विवाह सोहळ्यात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. या वेळी ४१ नवदाम्पत्यांचा शास्त्रशुद्ध पद्धतीने विवाह संपन्न झाला.




या प्रसंगी आमदार डॉ. किरण लहामटे, नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे, उद्योग समूहाचे चेअरमन राजेश मालपाणी यांच्यासह मालपाणी परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमदार खताळ म्हणाले, विवाहसमारंभात होणारी अनाठायी उधळपट्टी टाळूनही अत्यंत देखण्या पद्धतीने विवाह सोहळा पार पडू शकतो, हे मालपाणी समूहाने सिद्ध केले आहे. सामुदायिक विवाहामुळे अनेक कुटुंबांवरील आर्थिक ओझे कमी होत असून बचतीचा संदेश समाजात पोहोचतो. तसेच नवदाम्पत्यांना वृक्षारोपणाचा संदेश देत सामाजिक बांधिलकीही जपली जात आहे.

आमदार लहामटे यांनी सामुदायिक विवाह ही काळाची गरज असल्याचे सांगत या उपक्रमाचे कौतुक केले. नगराध्यक्षा डॉ. तांबे यांनीही या चळवळीमुळे संगमनेरची ओळख राज्यभर निर्माण झाल्याचे नमूद केले. प्रास्ताविकात डॉ. संजय मालपाणी यांनी गेल्या २९ वर्षांचा आढावा घेत सांगितले की, या उपक्रमातून आतापर्यंत सुमारे दीड हजार विवाह यशस्वीरीत्या पार पडले आहेत. उच्चशिक्षित तरुण-तरुणींचाही या सोहळ्यात वाढता सहभाग दिसून येत आहे. सोहळ्याची वैशिष्ट्ये म्हणून नवदाम्पत्यांना रोपांची भेट देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. आकर्षक ट्रॅक्टरमधून नवरदेवांची शाही मिरवणूक काढण्यात आली होती. हजारो नागरिकांनी या मिरवणुकीला मोठी गर्दी केली.

संपूर्ण कार्यक्रमासाठी विविध समित्यांच्या माध्यमातून काटेकोर नियोजन करण्यात आले होते. मोठ्या संख्येने उपस्थित असतानाही भोजन व इतर व्यवस्था सुरळीत पार पडल्या. सुवर्णा काकी मालपाणी यांनी सादर केलेल्या मंगलाष्टकाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. एकूणच, साधेपणा, शिस्त आणि सामाजिक संदेश यांचा संगम असलेला हा सोहळा संगमनेरच्या सामाजिक जीवनात आदर्श ठरला.

# केंब्रिज हाय इंटरनॅशनल स्कूलचा १० वीचा १००% निकाल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : जिल्ह्यात शैक्षणिक गुणवत्तेत नेहमीच अग्रेसर असलेल्या श्रीरामपूर येथील केंब्रिज हाय इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज या नामांकित संस्थेच्या केंद्रीय शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसई दिल्ली बोर्डाने घेतलेल्या २०२६ इयत्ता १० वीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवून मानाचा तुरा रोवला. या परीक्षेत ऋतुजा किरण दळवी हिने ९४.६ टक्के गुण मिळवून प्रथम, रिद्धी संजय हजारे ९४.४ टक्केसह द्वितीय, तर वीरेंद्र पृथ्वीराज चव्हाण याने ८१.२ टक्के सह तृतीय क्रमांक मिळून नेत्रदीपक यश मिळवल्याची माहिती संस्थेचे डायरेक्टर दत्तात्रय पवार यांनी माध्यमांना दिली. शाळेतील तीन विद्यार्थ्यांनी मराठी विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण तसेच दोन विद्यार्थ्यांनी माहिती तंत्रज्ञान विषयात ९९ गुण प्राप्त करून सर्व विक्रम मोडीत काढले. या यशामुळे मराठी विषयाचे प्राध्यापक धीरजकुमार सिंग सरांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

संस्थेचे सचिव प्रमोद निर्मळ यांनी आपल्या शिक्षण क्षेत्रातील वीस वर्षाच्या अनुभव आधारित शैक्षणिक क्षेत्रात विकसित केलेल्या पॅटर्नमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत आहे. केंब्रिज स्कूल मध्ये मूलभूत संकल्पना स्पष्ट करून त्या आधारावर विद्यार्थ्यांना आयआयटी,जेईई, नीट, सीईटी यासारख्या स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यासाठी तयार केले जाते. शालेय अभ्यासक्रम बरोबर विद्यार्थ्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्वसाठी सुंदर हस्ताक्षर, वाचन, लेखन, सामान्य ज्ञान तसेच खेळाच्या माध्यमातून शारीरिक विकासावरही भर दिला जातो. या व्यतिरिक्त शाळेमध्ये विविध स्पर्धा परीक्षेची तयारी करून घेतले जाते. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी बोर्डाच्या परीक्षा अगोदर पाच सराव परीक्षा व अनेक घटक चाचण्याच्या माध्यमातून वर्षभर सुरू असलेल्या तयारीचे हे गोड फळ असल्याची माहिती संस्थेचे मॅनेजिंग ट्रस्टी नीता निर्मळ यांनी दिली.

# विखे महाविद्यालयातील ५८ विद्यार्थ्यांची बहुराष्ट्रीय कंपनीत निवड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री विखे पाटील महाविद्यालयात या नामांकित बहुराष्ट्रीय कंपनीचा कॅम्पस इंटरव्ह्यू नुकताच पार पडला. या भरती प्रक्रियेत एकूण १४३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी ५८ विद्यार्थ्यांची कंपनीने अंतिम निवड केली असल्याची माहिती महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. आर. ए. पवार यांनी दिली.

कंपनीच्या वतीने विद्यार्थ्यांची लेखी व मौखिक परीक्षा घेण्यात आली. पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना निवडीची प्रमाणपत्रे यावेळी देण्यात आली. या मुलाखतीसाठी कंपनीचे वरिष्ठ अधिकारी धनंजय माने, जनमेश तारे, अभिजीत सुकाळे, श्रीकांत मिश्रा, जितेंद्र येवले आणि पोपट पाटील उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना कंपनीच्या कार्यपद्धती व करिअर संधींबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलचे आप्पासाहेब शेळके, डॉ. हरिभाऊ दुबे आणि डॉ. राजेंद्र गायकर यांनी विशेष परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात करिअर घडवण्यासाठी त्यांनी मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर बदलत्या तंत्रज्ञानाची माहिती, औद्योगिक क्षेत्रासाठी आवश्यक कौशल्ये, प्रकल्प आधारित शिक्षण, संवाद कौशल्य आणि औद्योगिक भेटी यांद्वारे प्रशिक्षण दिले जाते. दरवर्षी विद्यार्थ्यांना प्लेसमेंट मिळवून देण्यावर महाविद्यालयाचा विशेष भर असतो. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कंपन्यांशी करार, माजी विद्यार्थ्यांचा समन्वय आणि कौशल्याधारित शिक्षणावर भर दिला जात असल्याचे डॉ. पवार यांनी सांगितले.

# साईबाबा हॉस्पिटलमध्ये १५ किलोची गाठ काढून यशस्वी शस्त्रक्रिया

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साईबाबा संस्थान संचलित श्री साईबाबा हॉस्पिटल येथे जनरल सर्जरी विभागात अत्यंत जटिल व धाडसी शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडली. सुमारे ३२ सेंटीमीटर आकाराची आणि अंदाजे १५ किलो वजनाची पोटातील गाठ रुग्णाच्या शरीरातून सुरक्षितपणे काढण्यात आली.



सध्या रुग्णाची प्रकृती समाधानकारक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. जळगाव येथील मायाबाई राठोड (वय ४६) या गेल्या तीन वर्षांपासून पोटाच्या गंभीर आजाराने त्रस्त होत्या. विविध ठिकाणी उपचार करूनही अपेक्षित लाभ न झाल्याने त्यांनी शिर्डी येथे उपचारासाठी धाव घेतली. जनरल सर्जन डॉ. रणजीत भोजने यांनी तपासणीनंतर तातडीने शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. डॉ. रणजीत भोजने यांच्या नेतृत्वाखाली तसेच भूलतज्ज्ञ डॉ. संतोष सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली.

जनरल ओटी विभागातील विद्या कदम, निलेश रावस, शहनाज पठाण, योगिता डालोरे, बाळासाहेब मोगल, गौतम मोकळ, रवी निर्मळ, बाळू डांगे या प्रशिक्षित वैद्यकीय व सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या अचूक नियोजन व आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने ही अवघड शस्त्रक्रिया पार पडली. सदर शस्त्रक्रिया आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत पूर्णपणे मोफत करण्यात आली असून रुग्णाच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली आहे. रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले आहे. या यशस्वी शस्त्रक्रियेबद्दल संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भीमराज दराडे, वैद्यकीय संचालक डॉ. शैलेश ओक तसेच उपवैद्यकीय संचालक डॉ. प्रीतम वडगावे यांनी वैद्यकीय पथकाचे अभिनंदन केले.

# संघर्षातून गाठले 'सुवर्णशिखर' ॲड. आसावा यांना पाच सुवर्णपदक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव** : राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील रयत शिक्षण संस्थेच्या बापूजी सहादू कडू पाटील विद्यालयाचा माजी विद्यार्थी ड. गोविंद प्रेमलता श्रीकांत आसावा याने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल करत गुजरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीमध्ये तब्बल पाच सुवर्णपदके पटकावून सुवर्णभरारी घेतली आहे. भारताचे सरन्यायाधीश यांच्या हस्ते सन्मानित होत त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा राष्ट्रीय पातळीवर उमटवला आहे. शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या गोविंद आसावा यांचा जीवनप्रवास संघर्षमय राहिला.

वडिलांच्या आकस्मिक निधनानंतर कुटुंबावर आलेले संकट, आर्थिक अडचणी आणि जबाबदाऱ्या यांचा सामना करत त्यांनी खचून न जाता याच संकटातून प्रेरणा घेतली. अथक परिश्रम, जिद्द आणि आई-वडील तसेच गुरुजनांचे संस्कार यांच्या बळावर त्यांनी यशाचा हा शिखर गाठला. सन २०१९-२० या कालावधीत बापूजी कडू पाटील विद्यालयात शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी अहमदाबाद व गांधीनगर येथे पुढील विधी शिक्षण पूर्ण केले. शिक्षणादरम्यान सातत्यपूर्ण गुणवत्ता राखत त्यांनी पाच सुवर्णपदकांवर नाव कोरले आणि आपल्या गावाचे, शाळेचे व संस्थेचे नाव उज्ज्वल केले. या यशानंतर विद्यालयात त्यांचा विशेष सत्कार सोहळा पार पडला. उपाध्यक्ष अरुण कडू पाटील यांच्या हस्ते शाल व बुके देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना ड. गोविंद आसावा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना यशासाठी सातत्य, वाचनाची सवय आणि चालू घडामोडींचे ज्ञान किती महत्त्वाचे आहे हे अधोरेखित केले. वर्तमानपत्र वाचनामुळे विचारक्षमता वाढून स्पर्धात्मक परीक्षांमध्ये मोठा फायदा होतो, असे त्यांनी उदाहरणांसह स्पष्ट केले. आपल्यासमोर अशा यशस्वी विद्यार्थ्यांचे उदाहरण ठेवण्यामागचा उद्देश म्हणजे इतर विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन स्वतःचे करिअर घडवावे, असे आवाहन अध्यक्षस्थानावरून अरुण कडू पाटील यांनी केले. समाजाचे देणे फेडण्याची जाणीव ठेवत पुढे जाण्याचा संदेशही त्यांनी दिला. गोविंद आसावा यांच्या या अभूतपूर्व यशामुळे संपूर्ण परिसरात अभिमानाची भावना निर्माण झाली असून, विद्यार्थ्यांसाठी ते प्रेरणास्थान ठरत आहेत.


## जाहीर निविदा

### ग्रामपंचायत चासनळी ता. कोपरगाव जि .अहिल्यानगर

ग्रामपंचायत चासनळी ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर येथील कामाचे सन २०२५/२६ साठी नोंदणीकृत, ठेकेदार ,पुरवठादार यांच्याकडून सीलबंद निविदा मागवण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनेचे नाव | कामाचे नाव | निविदा रक्कम | निविदा फी | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे | मौजे चासनळी येथे जगदंबनगर (गावठाण) पेव्हर ब्लॉक बसवणे ता कोपरगाव | ४,१६,९१२ | ३०० | सु.बे |
| २ | अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे | मौजे चासनळी येथे माणकेश्वर नगर (गावठाण) बंदिस्त गटात करणे ता. कोपरगाव | १,६६,३५७ | ३०० | सु.बे |

**अटी व शर्ती** : १) निविदा फार्म माहितीपत्रक दि.२२/४/२०२६ते २९/४/२०२६ या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालयीन वेळेत मिळतील. २) बी १ निविदा दि. ३०/४/२०२६ रोजी स ११ वा उघडण्यात येईल. ३) निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**चासनळी, ग्रामपंचायत ता कोपरगाव.**



## जाहीर लिलाव

तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी कोपरगाव यांचे कार्यालय, ता. कोपरगाव जि. अहिल्यानगर

वाळूसाठ्याचा जाहीर लिलाव

मौजे सुरेगाव डेपो क्र. १, कुंभारी डेपो क्र. १ व मायगाव देवी ता. कोपरगांव येथील डेपो मधील शिल्लक वाळू साठ्याचा लिलाव करणे बाबत. कोपरगाव तालुक्यातील मौजे सुरेगाव डेपो क्र. १, कुंभारी डेपो क्र.१ व मायगाव देवी येथील डेपो मधील प्रत्यक्षातील शिल्लक एकुण १२६५.६ ब्रास वाळूसाठ्याचा जाहीर लिलावाद्वारे विक्री करुन गौणखनिजाची रक्कम वसुल करणेकामी मा. उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी शिडर्डी यांचे यांचेकडील पत्र जा.क्र. कावि/जमीन २ ब/गौख/ए-८४९१७१७/२०२६ दि. १०/०४/२०२६ अन्वये मा. तहसीलदार कोपरगाव यांना आदेशीत केले आहे. त्यानुसार दि. ३०/०४/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. तहसिल कार्यालय कोपरगाव येथे मौजे सुरेगाव डेपो क्र. १. कुंभारी डेपो क्र. १ व मायगाव देवी येथील डेपो मधील प्रत्यक्षातील शिल्लक एकुण १२६५.६ ब्रास वाळु साठ्याचा लिलाव करण्यात येत आहे. तरी जास्तीत जास्त ईच्छुक व्यक्ती/संस्थांनी लिलावात भाग घ्यावा. लिलावातील अटी व शर्ती, लिलावात असलेले साठ्याच्या, हातची किंमत, बाबत कार्यालयीन वेळेत तहसिल कार्यालय कोपरगाव येथे संपर्क साधावा.

**सदर डेपो मध्ये शिल्लक असलेल्या वाळूसाठ्याचा तपशील खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | डेपोचे नाव | डेपोमध्ये शिल्लक वाळू साठा (ब्रास मध्ये) |
|---|---|---|
| १ | सुरेगाव डेपो क्र.१ | ३३.७८ |
| २ | कुंभारी डेपो क्र.१ | ७०.२२ |
| ३ | मायगाव देवी | ११६१.६ |
| | एकुण | १२६५.६ |

**तहसिलदार, कोपरगाव**


# संपामुळे श्रीरामपूर महसूल विभाग 'आऊट ऑफ सर्व्हिस'

## नागरिकांचे हाल; कामे खोळंबली



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी 'राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना' आणि 'सरकारी-निमसरकारी कर्मचारी समन्वय समिती'ने पुकारलेल्या राज्यव्यापी संपाचे पडसाद श्रीरामपूर तालुक्यात उमटले आहेत. श्रीरामपूर प्रांत व तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी मंगळवार (दि.२१) पासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे.

कर्मचाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात प्रामुख्याने नॅशनल पेन्शन स्कीम सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी अधिसूचना जारी करावी, निवृत्तीचे वय ६० वर्षे करण्यात यावे, १० वर्षांहून अधिक काळ कार्यरत असणाऱ्या सर्व कंत्राटी, मानधन व रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित कराव्यात, महसूल विभागासह सर्व संवर्गातील रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठवण्यात यावी, सर्व कर्मचाऱ्यांसाठी 'कॅशलेस' उपचार देणारी व्यापक आरोग्य विमा योजना लागू करावी अशा विविध मागण्या केल्या आहेत.

निवेदनाव्दारे तहसीलदार श्रीरामपूर यांना कळवले आहे की, जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत ते कामावर उपस्थित राहणार नाहीत. या संपामुळे महसूल विभागातील दैनंदिन कामे, दाखल्यांचे वाटप आणि अन्य प्रशासकीय सेवांवर मोठा परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या वर्षभरापासून आम्ही शांततेच्या मार्गाने निदर्शने आणि आंदोलने करत आहोत,

मात्र शासनाकडून केवळ पोकळ आश्वासने मिळाली आहेत. आता ठोस निर्णयाशिवाय माघार नाही, असा पवित्रा श्रीरामपूर तालुका महसूल कर्मचाऱ्यांनी घेतला आहे. या निवेदनावर सहा. महसूल अधिकारी, महसूल सहायक, ग्राम महसूल अधिकारी, महसूल सेवक यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## द•ख•ल

### रमेश मोरे यांना पुणे विद्यापीठाची पी.एच.डी



**कोपरगाव** : डॉ.रमेश हरिभाऊ मोरे यांना व्यवस्थापन शाखेतून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून पी.एच.डी पदवी प्रदान करण्यात आली.डॉ. रमेश मोरे यांनी Role Of Professional Educational Institutions In Employment Generation Entreprenurship Development With Reference To Ahilyanagar Nashik District. या विषयावर डॉ. संदीप निंबाळकर यांचे मार्गदर्शना खाली आपला प्रबंध सादर केला. सदरचा प्रबंध इंजिनिअरिंग कॉलेज,फार्मसी व एम.बी.ए कॉलेज मधील विद्यार्थ्यांसाठी खूपच उपयुक्त असून व्यवसायिक शिक्षण देणा-या संस्थानी नोकरी व स्वयंरोजगार वाढविण्यासाठी नक्की काय केले पाहिजे ? यावर हा प्रबंध मार्गदर्शन करतो.या प्रबंधामधील शोध व संदेश यांच्या माध्यमातुन स्वायत्त शिक्षण देणा-या संस्थांना त्यांचे अभ्यासक्रम बदलण्यास भाग पाडले जाणार असून त्यामधुन त्यांना नोकरीस व स्वयंरोजगारास योग्य असे अभ्यासक्रमात तयार करावे लागणार आहे.यामधुन देशाच्या विकासाला देखिल चालना मिळणार आहे. सदरचा प्रबंध तयार करण्यासाठी डॉ.रमेश मोरे यांना अनेक शिक्षण तज्ञांचे मार्गदर्शन लाभले आहे.

### राहुल वाडकर यांना अमेरिका युनिव्हर्सिटीची डॉक्टरेट



**नेवासा** : सेवाभाव, समर्पण आणि मानवतेच्या भावनेने कार्य करणारे एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असलेल्या नेवासा तालुक्यातील भेंडे येथील प्रसिध्द गायक अविनाश वाडकर यांचे चिरंजीव राहुल वाडकर यांना अमेरिका युनिव्हर्सिटी यांच्याकडून मानद डॉक्टरेट पदवी बहाल करण्यात आली आहे. आपल्या सेवाभावाने आणि कष्टाने अनेक लोकांना नवजीवन दिल्याबद्दल ही पदवी राहुल वाडकर यांना बहाल करण्यात आली आहे. लुईझियाना रिसर्च युनिव्हर्सिटी, युएसए मानद डॉक्टरेट पुरस्कार सोहळा २०२६ पुणे येथे नुकताच पार पडला यामध्ये नेवासा तालुक्यातील भेंडा येथील प्रसिद्ध गायक अविनाश वाडकर व संगीता वाडकर यांचे चिरंजीव राहुल वाडकर यांना लुईझियाना संशोधन विद्यापीठ, अमेरिका यांची मानद डॉक्टरेट पदवी पुणे येथे झालेल्या अवॉर्ड सिरेमनी कार्यक्रमात आरोग्यसेवा, सेवाभाव, समर्पण आणि मानवतेच्या भावनेने केलेल्या कार्यासाठी राहुल वाडकर यांना ही मानद डॉक्टरेट पदवी आर्मी कॅप्टन समीर सेन,डॉ. बाबासाहेब तपकीर,डॉ. संभा सरकुंटे, डॉ.अँड.तुकाराम बागुल,डॉ.आणू कृष्णा,डॉ. सुनीता भंडारी या प्रमुख मान्यवर मंडळींच्या उपस्थितीत बहाल करण्यात आली.

### सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमात ध्वजारोहणाने पारायण सोहळ्याचा शुभारंभ



**नेवासा** : नेवासा बुद्रुक शिवारातील सुरेगाव रस्त्यावर असलेल्या सदगुरू नारायणगिरी महाराज आश्रमात मंगळवार (दि. २१ एप्रिल) रोजी संत-महंतांच्या उपस्थितीत धर्मध्वजारोहण करून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. हा सोहळा दि. २८ एप्रिलपर्यंत चालणार असून यंदाचे ११ वे वर्ष आहे. सदगुरू ब्रह्मलिन नारायणगिरीजी महाराज यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित या कार्यक्रमात महंत श्री उद्धवजी महाराज मंडलिक यांच्या मार्गदर्शनाखाली वेदमंत्रांच्या जयघोषात ध्वजारोहण पार पडले. यावेळी स्वामी सुनीलगिरी महाराज, रमेशानंदगिरी महाराज, ऋषिनाथ महाराज, हभप विश्वनाथ महाराज मंडलिक, तसेच अंकुश महाराज जगताप आदींच्या हस्ते कलश व ग्रंथपूजन करण्यात आले. कार्यक्रमात संत-महंतांचे पूजन करून त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच नेवासा बुद्रुक येथून आलेल्या पायी दिंडीतील वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. आठ दिवस चालणाऱ्या सप्ताहात दररोज काकडा भजन, स्तोत्रपठण, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, हरिपाठ व कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यास पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सप्ताहातील पारायण व कीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन महंत उद्धवजी महाराज मंडलिक व भक्त परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

### उष्णतेचा कहर : पाथर्डीत तरुण शेतकऱ्याचा उष्माघाताने मृत्यू



**पाथर्डी** प्रतिनिधी : तालुक्यात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या उष्णतेच्या तीव्रतेने आता जीवघेणे रूप धारण केले असून, निवडुंगे गावात एका तरुण शेतकऱ्याचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. राधाकृष्ण रामचंद्र मरकड (वय ३३) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून त्यांच्या आकस्मिक निधनामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. मरकड कुटुंब शेतीवर उदरनिर्वाह करत असून, नेहमीप्रमाणे राधाकृष्ण मरकड शेतातील कामात व्यस्त होते. मात्र, त्या दिवशी तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला होता. कडक उन्हाच्या तडाख्यात काम करत असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. काही क्षणांतच त्यांना चक्कर येऊन ते शेतातच कोसळले. घटनेची माहिती मिळताच आसपासच्या शेतकऱ्यांनी तातडीने धाव घेतली आणि त्यांना तत्काळ उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर उपचार सुरू करण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे घोषित केले. या घटनेने उपस्थितांना मोठा धक्का बसला. यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पाठविण्यात आला असून, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्राथमिक निष्कर्षात उष्माघातामुळेच मृत्यू झाल्याचा अंदाज व्यक्त केला आहे. पाथर्डी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, तालुक्यात वाढत्या तापमानामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या तीव्र होत आहेत. उष्माघात, निर्जलीकरण आणि थकवा यांसारख्या तक्रारींमध्ये वाढ होत असून विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी व मजुरांना दुपारच्या वेळेत काम करावे लागत असल्याने त्यांच्यावर मोठा धोका निर्माण झाला आहे.

# डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने अहिल्यानगर येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्घाटन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : महाराष्ट्रातील वाढत्या उपस्थितीला अधिक बळकटी देत, डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने आज अहिल्यानगर येथे अत्याधुनिक नेत्रसेवा केंद्राचे उद्घाटन माननीय श्री. संग्राम जगताप (महाराष्ट्र विधानसभेचे आमदार) यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलच्या वरिष्ठ नेतृत्वातील डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) आणि श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) तसेच वैद्यकीय क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अहिल्यानगर परिसरातील वेगाने विकसित होत असलेल्या भागातील नागरिकांना प्रगत आणि सर्वसमावेशक नेत्रसेवा उपलब्ध करून देणे हा या केंद्राचा उद्देश आहे.

उद्घाटनाच्या निमित्ताने, ३१ मे २०२६ पर्यंत सर्व रुग्णांसाठी मोफत सर्वसमावेशक नेत्र तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक काळजीला प्रोत्साहन मिळेल.अपॉइंटमेंट साठी कृपया ८९२५५ १०८०७ या मोबाईल क्रमांकावर सम्पर्क संपर्क असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे

६,७३५ चौरस फूट क्षेत्रफळावर पसरलेले हे केंद्र आधुनिक पायाभूत सुविधा आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या साहाय्याने रुग्णकेंद्रित सेवा देण्यासाठी विशेषतः डिझाइन करण्यात आले आहे. या रुग्णालयात मोतीबिंदू, रिफ्रॅक्टिव्ह (लेसिक), कॉर्निया, काचबिंदू, रेटिना आणि बाल नेत्रचिकित्सा यांसारख्या सर्व सेवा उपलब्ध आहेत. तसेच एकाच छताखाली फार्मसी आणि ऑप्टिकल सेवा उपलब्ध करून देत संपूर्ण नेत्रसेवा प्रदान केली जाते. अनुभवी नेत्रतज्ज्ञ आणि प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या टीमद्वारे उच्च दर्जाची सेवा आणि उत्तम उपचार, परिणाम सुनिश्चित केले जातील.

या प्रसंगी बोलताना आमदार श्री. संग्राम जगताप म्हणाले, अहिल्यानगर सारख्या वेगाने विकसित होणाऱ्या भागांमध्ये सुलभ आणि विशेषीकृत आरोग्यसेवेची गरज वाढत आहे. डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलने प्रगत नेत्रसेवा लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केल्याबद्दल मी त्यांचे कौतुक करतो. यामुळे दृष्टीसंबंधित समस्यांचे लवकर निदान, प्रतिबंध आणि उपचार करण्यात महत्त्वाची भूमिका निभावली जाईल.

डॉ. वंदना जैन (चीफ स्ट्रॅटेजी ऑफिसर) यांनी सांगितले, डॉ. अग्रवाल्स आय हॉस्पिटलमध्ये आमचा मुख्य भर प्रगत नेत्रसेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यावर आणि उच्च दर्जाची वैद्यकीय गुणवत्ता राखण्यावर आहे. अहिल्यानगर केंद्र हे या वेगाने विकसित होणाऱ्या भागातील रुग्णांपर्यंत विशेष सेवा पोहोचवण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

श्री. राहुल अग्रवाल (चीफ ऑपरेटिंग ऑफिसर) म्हणाले,आम्ही रुग्णकेंद्रित सुविधा उभारण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत, ज्या मजबूत क्लिनिकल प्रणाली आणि उत्कृष्ट व्यवस्थापनावर आधारित आहेत. हे केंद्र उच्च दर्जाचे उपचार, परिणाम आणि उत्कृष्ट रुग्ण अनुभव देण्यासाठी डिझाइन केले आहे.



## पान १ वरुन

### पोटनिवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज

मतदान केंद्रांवर 'वेबकास्टिंग' द्वारे थेट लक्ष ठेवले जाणार आहे.मतदार ओळखपत्र नसलेल्या नागरिकांनाही आपला हक्क बजावता यावा, यासाठी भारत निवडणूक आयोगाने १२ पर्यायी कागदपत्रांना मान्यता दिली आहे. यामध्ये आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पासपोर्ट, बँक किंवा पोस्ट ऑफिसचे छायाचित्रयुक्त पासबुक आदींचा समावेश असून यापैकी कोणतेही एक ओळखपत्र दाखवून मतदान करता येणार आहे.

मतदारसंघातील १ लाख ७२ हजार २३१ पुरुष, तसे १ लाख ६१ हजार ३१२ स्त्री आणि ०२ इतर मतदारांनी २३ एप्रिल रोजी लोकशाहीच्या या उत्सवात हिरीरीने सहभाग नोंदवून जास्तीत जास्त मतदान करावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रत्येक नागरिकाने आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, मतदारांवर प्रभाव टाकणारी कोणतीही कृती टाळावी आणि निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे. तसेच निवडणुकीत सर्व पात्र मतदारांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होउन मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी अनुपसिंह यादव यांनी केले आहे.

### 'एनसीडीसी'चा सात साखर कारखान्यांना दणका !

कुकडी सहकारी साखर कारखाना, अहिल्यानगर (४९.८५ कोटी), श्री छत्रपती सहकारी साखर कारखाना, पुणे (३६१.४१ कोटी) आणि राजगड सहकारी साखर कारखाना, पुणे (४६७.८५ कोटी) या सात कारखान्यांचे कर्ज प्रस्ताव एनसीडीने फेटाळून लावले आहेत.

भाजपवासी संग्राम थोपटे यांची पंचाईत – राजगड सहकारी साखर कारखान्याचे नेते संग्राम थोपटे यांनी कारखाना वाचविण्यासाठी काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्या बदल्यात राज्य सरकारने कारखान्याचा विस्तार करण्यासाठी ४६७.८५ कोटी रुपयांचे कर्ज देण्याचा प्रस्ताव एनसीडीसीकडे पाठविला होता. पण, कारखाना २०२३–२४ पासून बंद आहे. २०२२–२३ मध्ये क्षमतेपेक्षा ५० टक्के कमी उत्पादन होते. कारखान्यावर ५८.८३ कोटी रुपयांचे कर्ज आहे. कारखान्याची आर्थिक स्थिती कमकुवत आहे. प्रशासकीय खर्च कमी करण्याची गरज आहे. कर्जाचा प्रस्ताव जास्त आणि व्यवहार्य नाही, असे म्हणत एनसीडीसीने कर्ज प्रस्ताव नामंजूर केला आहे. त्यामुळे थोपटे यांची राजकीय कोंडी वाढली आहे.

### मी संघर्षयोद्ध्याची सहचारिणी...

सुनेत्रा पवार म्हणाल्या की, दादांच्या अपघाताबाबत जशा तुमच्या मनात शंका आहेत तशाच माझ्यादेखील मनात आहेत. त्यामुळेच मी नरेंद्र मोदी आणि अमित शाह यांची भेट घेऊन विनंती केली आहे. काही चुकीचं आढळल्यास कठोरात कठोर शिक्षा ही व्हायलच हवी. त्यासाठी मी प्रयत्न करेन.

सर्व पक्षांनी आपल्याला दिलेल्या पाठिंब्याबद्दल आभार मानते, शरद पवार आमि सुप्रिया सुळे यांचे विशेष आभार मानते असं सुनेत्रा पवार म्हणाल्या. दादांनी बारामतीला ज्या उंचीवर नेलं, जो मान देशात मिळवून दिला तोच आपल्याला टिकवायचा आहे, असंही त्या म्हणाल्या.

महायुतीच्या मंचावर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही हजेरी लावली. या सभेत बोलताना सुप्रिया सुळे यांनी महाविकास आघाडी सुनेत्रा पवारांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचं स्पष्ट केलं. तसेच कार्यकर्त्यांना एकजुटीने काम करण्याचे आवाहनही त्यांनी केलं.

## डेल टेक्नॉलॉजीचा भारतात एआय आधारित 'डेल १५' लाँच

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक** : डेल टेक्नॉलॉजीने ज्यांना दिवसभरात अधिक गोष्टी साध्य करायच्या असतात, अशा ग्राहकांसाठी डिझाइन केलेला डेल १५ आज भारतात लाँच केला आहे. इंटेल कोअर अल्ट्रा २ सिरिज एच प्रोसेसरवर आधारित असलेल्या या डिव्हाईसमध्ये ॲरो लेक आर्किटेक्चर आणि एडवांस्ड ऑन–डिव्हाइस एआयसाठी स्वतंत्र एनपीयू उपलब्ध आहे. डेल १५ वापरकर्त्यांना अभ्यास, काम किंवा कुटुंब आणि मित्रांशी संपर्क साधताना अधिक स्मार्ट आणि सीमलेस मल्टीटास्किंगचा आनंद घेण्यास सक्षम करतो. यातील विंडोज ११ मध्ये इंटेलिजंट असिस्टंससाठी समर्पित कोपायलट की,शांत आणि सुरळीत कामगिरीसाठी ॲडॉप्टिव्ह थर्मल टेक्नॉलॉजी आणि जलद चार्जिंगसाठी एक्सप्रेसचार्ज सारख्या वैशिष्ट्यांसह वापरकर्ते आपली कामे सहजपणे पूर्ण करू शकतात आणि दीर्घकाळ कनेक्टेड राहू शकतात. डेल १५ हा एकाच डिव्हाईसमध्ये विश्वासार्हता, नवनिर्मिती आणि



शाश्वततेला एकत्र आणतो, ज्यामुळे लोकांना सर्वात महत्त्वाच्या गोष्टी प्राधान्याने पूर्ण करण्यास मदत होते. किंमत (करांसह): डेल १५ ची सुरुवात रु. ६९,६९९ पासून होते.

डेल १५ ची आकर्षण ऑफर्स: निवडक बँकांच्या क्रेडिट कार्ड ईएमआयवर रु. ५००० पर्यंत कॅशबॅक., सर्व बँकांच्या क्रेडिट कार्ड्स आणि निवडक बँकांच्या डेबिट कार्ड्सवर ३, ६, ९ आणि १२ महिन्यांच्या ईएमआय प्लॅनसाठी नो कॉस्ट ईएमआय उपलब्ध आहे., रु. ९९ मध्ये १ वर्षाचे एडीपी आणि रु. २९९ मध्ये वॉरंटीत १ वर्षाची मुदतवाढ., झिरो डाऊन पेमेंट फायनान्सचे पर्याय उपलब्ध आहेत. आणि केवळ रु. ९९९ मध्ये एआय झोलो प्रो – १ वर्षाचे मल्टिमॉडेल सबस्क्रिप्शन.

उपलब्धता : नवीन डेल १५ डिव्हाईस हे डेल डॉट कॉम, डीईएस, मोठ्या रिटेल स्टोअर्स आणि मल्टि–ब्रँड आउटलेट्सवर खरेदीसाठी उपलब्ध असतील. लाँचबद्दल बोलताना डेल टेक्नॉलॉजीजच्या एपीजे कन्ड्युमर बिझनेसचे व्हाईस प्रेसिडेंट आणि जनरल मॅनेजर राजकुमार ऋषी म्हणाले, तंत्रज्ञानाने व्यक्तींना अधिक साध्य करण्यासाठी सक्षम केले पाहिजे आणि नवीन डेल १५ भारतात आमच्या ग्राहकांसाठी नेमके तेच करते असा आमचा विश्वास आहे. काम, शिक्षण आणि सर्जनशीलता वेगाने विकसित होत .

## आम्ही कोणत्याही पक्षाचे समर्थक नाही व विरोधकही नाही : महंत रामगिरी महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर:** राजसत्ता व धर्मसत्ता या पहिल्यापासूनच समन्वयाने चालत आलेल्या आहेत. गोदाधाम सरला बेटाचे अंतिम ध्येय अध्यात्म असून आम्ही कधीच कोणत्याही पक्षाचे समर्थन करत नाही तसेच कोणत्याही पक्षाचे विरोधकही नाही. आम्ही जे कार्य करतो तेच कार्य एखादा पक्ष करत असेल तर आम्ही त्या विचारांसोबत राहतो. योग्य व्यक्तीच्या हातात सत्ता असल्यास त्याचा सदुपयोग होतो. राजकारण हा आमचा विषय नसून समाज प्रबोधन हेच आमचे कार्य आहे. राजसत्तेवर धर्मसत्तेचा अंकुश असेल तरच समाज परिवर्तन घडू शकते, असे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले.

, ता. वैजापूर येथे संभाजीनगर जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे मित्र मंडळ यांच्या वतीने दि. १८ शनिवारी रोजी सायंकाळी आयोजित कृतज्ञता सोहळा, जिल्हा परिषद पदाधिकाऱ्यांचा सत्कार समारंभ व भव्य नागरी सत्कार कार्यक्रम प्रसंगी श्रीक्षेत्र गोदाधाम सरला बेटाचे महंत रामगिरी महाराज मार्गदर्शन करत होते.

यावेळी महंत रामगिरी महाराज पुढे म्हणाले की, नामांतरानंतर संभाजीनगर जिल्हा परिषदेचे पहिले अध्यक्ष म्हणून अविनाश गलांडे यांची निवड झाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत शुभेच्छा दिल्या. तसेच अध्यक्ष निवडीचा घटनाक्रम, शासनाच्या सुरू असलेल्या लोककल्याणकारी योजनांवर पक्षाची भूमिका यावर मान्यवरांनी आपले विचार मांडले.

या कार्यक्रमाला राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. याप्रसंगी संजय खंबायते, गोपीचंद पडळकर, दिनेश भाऊ परदेशी, अविनाश गलांडे, जितू बाबा जयस्वाल,



सचिन गरड, ज्ञानेश्वर मोठे, किशोर आबा पवार, प्रा. संजय गव्हाणे, डॉ. तृप्ती राजपूत, जयेश मलदोडे, मनोज गायके, संजय निकम, पंकज ठोंबरे, वाल्मिक शिरसाठ, विशाल संचेती, प्रशांत कंगले, रतन बत्तीसे सरला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज,आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या प्रसंगी परिसरातील मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांचे सातारा येथे फार्मर कप प्रशिक्षण

**माळशिरस :** एक एकट्याने शेती करण्याच्या पद्धतीला पूर्ण विराम देत गट शेती व त्याचे शेतकऱ्यांना होणारे लाभ याविषयी पाणी फाउंडेशन, राज्य शासनाचा कृषी विभाग व पंचायत समितीचा उमेद यांच्या वतीने राज्यात सध्या सर्वत्र शेतकऱ्यांना प्रबोधन व मार्गदर्शन करण्यात येत आहे याचाच एक भाग म्हणून पुरंदर तालुक्यातील विविध गावातील सुमारे ५२ शेतकऱ्यांचे तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण नुकतेच पार पडले. सातारा येथील मेगा फूड पार्क येथे झालेल्या या प्रशिक्षणाला दिवे, झेंडेवाडी, परिंचे, सोमुर्डी, मांडकी, मांढर, मावडी, आंबोडी,उदाचीवाडी, राजुरी, पिसर्वे, नीरा , नारायणपूर आदी विविध ठिकाणच्या महिला व पुरुष शेतकऱ्यांनी या प्रशिक्षणाचा लाभ घेतला. सदरच्या प्रशिक्षणात गटशेती त्यासाठी बीज प्रक्रिया निविष्ठा खरेदी, कीड नियंत्रण उपाय, कृषी शास्त्रज्ञांचे ऑन लाईन मार्गदर्शन, बियाणे उगवण क्षमता, पेरणीची शास्त्रीय पद्धत, गटनोंदणी, बँक व्यवहार, विषमुक्त शेती डिजिटल शेती शाळा, एस.ओ.पी (स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रॅक्टिसेस) , पाण्याचा पर्याप्त वापर, सराव, सातत्य आदी अनेक मुद्यांच्या आधारावर शेतकऱ्यांना तीन दिवा बहुमोल मार्गदर्शन करण्यात आले. छोट्या छोट्या चित्रफिती, गट तयार करून त्याद्वारे खेळ व मिळणारा अनुभव, लिखित स्वरुपातील काही माहिती, बीज उगवण क्षमता तसेच कीड नियंत्रण याचे फील्डवर प्रात्यक्षिके, सहभागी सर्च शेतकऱ्यांची स्पर्धा व विजेत्यांना बक्षिसे अशा स्वरूपातील हे प्रशिक्षण उपस्थित शेतकऱ्यांना आपल्या गावात जाऊन गट शेती करण्याच्या प्रयत्नांना संजीवनी ठरले .

## मातोश्री सरूबाई पेसोडे यांना मुठेवाडगांवी सामुहिक श्रद्धांजली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगांव** : श्रीक्षेत्र देवगड येथील महंत भास्करगिरी महाराज यांच्या मातोश्रीं वैकुंठवासी सरूबाई ज्ञानदेव पेसोडे यांचेचे निधन झालेले असल्याने सर्वांनाच देवगड येथे जाणे शक्य नाही म्हणून मुठेवाडगाव येथील संत तुळशीराम महाराज मंदिरात विविध सामाजिक धार्मिक संघटनेचे वतीने सामूहिक शध्दांजली अर्पण करण्यात आली. या सार्वजनिक शध्दांजली मध्ये संत तुळशीराम महाराज देवस्थान , अध्यात्मिक विकास आघाडीचे भिकचंद, मुठे मित्रमंडळ ,ज्येष्ठ नागरिक संघटनेचे वसंतराव मुठेआणि भजनी मंडळ व ग्रामस्थ या सर्वांच्या वतीने वैकुंठवासी सरूबाई ज्ञानदेव पेसोडे यांनी सामूहिक भावपूर्ण शध्दांजली अर्पण करण्यात आली.



## संजीवनी ग्रुपने गुरुवर्य भास्करगिरी बाबांची घेतली सांत्वनपर भेट



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील देवगड दत्त पिठाचे प्रमुख महंत गुरुवर्य श्री भास्करगिरी बाबांच्या मातोश्री सरूबाई ज्ञानदेव पेसोडे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्यानिमित्ताने संजीवनी ग्रुपच्या ज्येष्ठ नागरिकांनी श्रीक्षेत्र देवगड येथे गुरुवर्य श्री भास्करगिरीजी बाबांची सांत्वनपर भेट घेऊन महाराजांना दुःख सहन करण्याची परमेश्वराने शक्ती देवो अशी प्रार्थना केली.

नेवासा तालुक्यामध्ये ज्येष्ठ नागरिकांचा संजीवन ग्रुप आहे या ग्रुपची दर महिन्याला मीटिंग होऊन विधायक विचार मंथन व सामाजिक उपक्रम यासंदर्भात चर्चा व कार्यवाही होते या ग्रुपमध्ये प्राथमिक शिक्षक माध्यमिक शिक्षक मुख्याध्यापक प्राचार्य व सेवानिवृत्त कर्मचारी सुमारे ८० सदस्य आहेत.

याप्रसंगी संजीवनी ग्रुपचे अध्यक्ष साहेबराव भणगे,सचिव रामकृष्ण नवले,माजी कुलगुरू डॉक्टर अशोकराव ढगे,उपप्राचार्य भैय्यासाहेब देशमुख, प्राचार्य रघुनाथराव आगळे,निवृत्ती ढोकणे,नामदेवराव मुंडे,दत्तात्रय आघाव,रामेश्वर शिंदे,गंगाधर भुजंग,पांडुरंग बरे,आसाराम कर्डिले,सोपानराव रोडगे,रावसाहेब बराटे, गणेश ढोकणे उपस्थित होते.

## निधन वार्ता

### माधवरांव मेघळे



**माळवाडगांव** : गोदाकाठच्या देवगांव शनी( ता.वैजापूर) येथील जुन्या पिढीतील शंभरी पार केलेल्या माधवरांव गणपतरांव मेघळे यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले ,एक मुलगी सुना,नातसुना नातवंडे पतवंडे असा मोठा परिवार असून सामाजिक कार्यकर्ते प्रवीण मेघळे यांचे ते आजोबा होत.


## नावात बदल

माझे लग्न पूर्वीचे नाव मीना सोपान घोलप असे होते लग्नानंतर ते बदलून मीनाताई प्रकाश शेळके असे नवे नाव झाले आहे दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून इतर अन्य दुसरी व्यक्ती कोणी नाही.
प्रतिज्ञापत्र क्र.
२५५२२४२०४१२६८१००५७९१७१
दिनांक १५/०४/२०२६


## वैजापूरच्या वीरगाव ग्रामपंचायतीत 'लाखांचा' घोळ?

### बनावट कागदपत्रांच्या आधारे निधी हडपल्याचा आरोप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** :लोकशाहीचा कणा मानल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये जनतेच्या विकासासाठी येणारा पैसा जातो कुठे, असा प्रश्न नेहमीच विचारला जातो. मात्र, वैजापूर तालुक्यातील वीरगाव–मुर्शदपूर ग्रुप ग्रामपंचायतीमध्ये चक्क विकासाच्या नावाखाली 'भ्रष्टाचाराची गंगा' वाहिल्याचा संशय व्यक्त होत आहे. सन २०२१ ते २०२६ या कार्यकाळात सरपंच आणि ग्रामसेवकांनी संगनमत करून बनावट कागदपत्रे आणि बोगस बिलांच्या आधारे केंद्र व राज्य शासनाच्या निधीचा अपहार केल्याचा खळबळजनक आरोप खुद्द उपसरपंचांनीच केला आहे. या तक्रारीमुळे संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.




वीरगाव–मुर्शदपूर ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच भरत शिवाजी कदम यांनी वैजापूरचे गटविकास अधिकारी (इूज) यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. कदम यांच्या दाव्यानुसार, गेल्या पाच वर्षांत पंधराव्या वित्त आयोगातून मिळालेल्या निधीमध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाला आहे. केंद्र सरकारच्या 'ई–ग्राम स्वराज्य' आणि 'माझी पंचायत' या पोर्टल्सवर उपलब्ध असलेल्या माहितीचा अभ्यास केला असता, धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत.

तक्रारदाराने पुराव्यांसह असा दावा केला आहे की, केवळ नाली दुरुस्तीच्या नावाखाली सुमारे १२ लाख रुपयांचा खर्च दाखवण्यात आला आहे. प्रत्यक्षात जमिनीवर इतक्या मोठ्या प्रमाणात काम झाले आहे का? हा मोठा प्रश्न आहे. केवळ कागदोपत्री घोडे नाचवून कामांचे अस्तित्व नसतानाही बिले काढण्यात आल्याचा संशय कदम यांनी व्यक्त केला आहे. या एका कामावरून ग्रामपंचायतीच्या इतर सर्व कामांवर संशयाची पाल चुकचुकत आहे.

सरपंच आणि ग्रामसेवकांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मासिक सभा, विशेष सभा आणि चक्क ग्रामसभांमध्येही बोगस ठराव पारित केल्याचा संशय तक्रार अर्जात नमूद करण्यात आला आहे. अनेक कामे पूर्ण न करताच त्यांची पूर्णत्वाची प्रमाणपत्रे जोडून शासनाची फसवणूक करण्यात आली आहे. ''शासनाचा निधी हा जनतेच्या घामाचा पैसा आहे, तो अशा प्रकारे लाटणे हा गंभीर गुन्हा आहे,'' अशी भावना स्थानिक नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

हे प्रकरण अतिसंवेदनशील असल्याने त्याची चौकशीही तितकीच पारदर्शक व्हावी, अशी मागणी भरत कदम यांनी केली आहे. गटविकास अधिकाऱ्यांनी उच्च दर्जाच्या निष्पक्ष अधिकाऱ्याची नेमणूक करून, तक्रारदाराच्या उपस्थितीत 'इन कॅमेरा' चौकशी करावी, जेणेकरून सत्य समोर येईल आणि पुराव्यांशी छेडछाड होणार नाही, असे अर्जात म्हटले आहे.ग्रामविकासाच्या गप्पा मारल्या जात असताना, प्रत्यक्षात गावपातळीवर अशा प्रकारे निधीचा अपहार होत असेल, तर तो चिंतेचा विषय आहे. आता या अर्जावर वैजापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी काय कारवाई करतात आणि दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल होतात का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. भ्रष्टाचाराच्या या आरोपांमुळे वीरगाव आणि मुर्शदपूर परिसरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.


## नशिबाची परिक्षा

**बुधवार दि .२२ एप्रिल २०२६**

### मिलनम डे

उदय-अस्त — सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२० ६७० ५८० | ३-४ | १२० २२८ २०० | जोड ३०-६०-१७-९२-४५ |

### कल्याण

उदय-अस्त — सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १०५ १३८ ६०८ | ६-१ | १२८ २९० २०९ | जोड ६२-९१-४५-०८-४५ |

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त — सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| ४८० ५७० ६६० | २-९ | १२६ १८० ११७ | जोड २१-०९-३५-६७-९४ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 10/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 17/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

## द•ख•ल

### रविंद्र गवळीच्या शस्त्रक्रियेसाठी मदतीचे आव्हान



**शहरटाकळी** : शेवगाव तालुक्यातील शहरटाकळी येथील येथील महालक्ष्मी मातेच्या यात्रा उत्सहात बारागाडी ओढण्याच्या कार्यक्रमात झालेल्या अपघातात येथील रविंद्र रावसाहेब गवळी (वय २५) याच्या अंगावरून गाडीचे चाक गेल्याने जबर दुखापत झालेली आहे.

रविंद्र रावसाहेब गवळी (वय २५) यास पुढील उपचारासाठी संचेती हॉस्पिटल पुणे येथे ऍडमिट केलेले असून हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी शस्त्रक्रियेसाठी पंधरा ते वीस लाख रुपये इतका प्रचंड खर्च सांगितला आहे, परंतु पालकाची परिस्थिती अतिशय नाजूक व हलाखीची असून, समाजातील दानशूर, समजदार व्यक्तीकडून आर्थिक मदतीची गरज असून सर्वांना कळकळीची विनंती आहे, एका हुशार, मेहनती विद्यार्थ्यांचे जीवन वाचविण्यासाठी काही का असेना आपल्याकडून थोड्या फार ऐपतीप्रमाणे, होता होईल तेवढी मदत करावी.आपण दिलेली प्रत्येक छोटी मोठी मदत त्याच्या जीवनात मोठा फरक घडवेल, आपण सारे मिळून रविंद्र गवळी यास नवजीवन देण्यासाठी आर्थिक मदतीचे आव्हान करण्यात आले असून तरी समाजातील दानशूर व्यक्तींनी फुल ना फुलाची पाकळी म्हणून एक मदतीचा हात देण्याची कृपा करावी, सदरील मदत ९९२१९९१७२९ ,७०२०८३५५२९ ,९८८१८८९४०९ या नंबर वरती फोन पे,गुगल पे वर मदत करावी, असे कळकळीचे आव्हान समस्त ग्रामस्थ शहरटाकळी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### पत्रकार कुरुमकर व लेखा अधिकारी तरटे यांचा मढेवडगाव सेवा संस्थेकडून सन्मान

**लिंपणगाव** : श्रीगोंद्याचे जेष्ठ पत्रकार नंदकुमार कुरुमकर व लेखा अधिकारी संतोष तरटे यांचा मढेवडगाव सेवा संस्थेच्या वतीने नुकताच सन्मान करण्यात आला.

दरम्यान नंदकुमार कुरुमकर हे ३९ वर्षाच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेतून सेवानिवृत्ती तसेच त्यांची राज्य शिक्षकेतर महासंघाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी निवड व लेखाधिकारी संतोष तरटे यांना सहकार विभागाचा दुसऱ्यांदा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल या दोन्हीही सत्कारमूर्तींचा संस्थेच्यावतीने सन्मानित करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन बापूसाहेब वाबळे हे होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे चेअरमन बापूसाहेब वाबळे, व्हाईस चेअरमन दत्तात्रेय झुंजरूक, गावचे लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे, जिल्हा युवक काँग्रेसचे स्मितल भैया वाबळे, माजी चेअरमन प्रकाश उंडे, संचालक भगवानराव कुरुमकर, ज्येष्ठ नेते विठ्ठलराव वाबळे यांच्यासह संस्थेचे सर्व संचालक यावेळी उपस्थित होते.प्रस्ताविकात संस्थेचे संचालक नवनाथ उंडे यावेळी बोलताना म्हणाले की, कुरुमकर सरांनी आमच्या मढेवडगाव गावावर चांगले संबंध जोपासले. मैत्री जोडली त्यांनी शैक्षणिक कार्य पार पाडून पत्रकारिता करणे हे सोपे काम नाही या दोन्ही कार्यात त्यांचे मोठे योगदान लाभल्याचे सांगितले.

### ज्येष्ठ शिक्षक रामभाऊ जांभळे यांचा सेवानिवृत्ती सत्कार सोहळा उत्साहात

**श्रीगोंदा** : नूतन मराठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेडगाव येथील ज्येष्ठ शिक्षक रामभाऊ जांभळे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित सत्कार सोहळा सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सूर्यवंशी सर होते. आपल्या दीर्घ सेवाकाळात जांभळे सरांनी शिस्त, वक्तशीरपणा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांची जपणूक करत विद्यार्थ्यांच्या घडणीत मोलाचे योगदान दिले. काम बोलतं, माणूस नाहीहीच त्यांची कार्यशैली होती, असं सहकाऱ्यांनी नमूद केलं.

समारंभात शिक्षक व कर्मचाऱ्यांनी मनोगत व्यक्त करत जांभळे सरांच्या कार्याचा गौरव केला. ग्रामस्थांनीही त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शाळेच्या उभारणीपासून ते विकासापर्यंत त्यांनी दिलेल्या योगदानाचा विशेष उल्लेख करण्यात आला.

या प्रसंगी लक्ष्मण रसाळ, भीमराव बेलेकर, किसन बेलेकर, विजय रसाळ, शाहूराज भोपळे, देविदास रसाळ, आप्पासाहेब भोसले, मोहन शेळके, अजित शेळके, चैत्राली शेळके (जांभळे), तुकाई देवी ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र शेळके, शंकर मांडगे, भगवान चव्हाण, आशा चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. ग्रामस्थ, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### माणुसकीने प्रेरित कृती हीच धर्म आणि अध्यात्माची अभिव्यक्ती

**अहिल्यानगर** : समवेदना, प्रेम आणि माणुसकीने प्रेरित कृती हीच धर्म आणि अध्यात्माची सच्ची अभिव्यक्ती असते. द्वेष आणि उन्मादातून विचार आणि कृतीत आलेली हिंसा भारतीय संस्कृतीसह जगातील सर्व धर्म आणि अध्यात्मिकता यांचा विनाश घडवीत असल्याचा इशारा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि विचारवंत डॉ. अभय बंग यांनी येथे दिला. स्नेहालय संस्थेचे वर्ष २०२५ - २६ चे बा, बापू , विनोबा आणि आदर्श शिक्षक पुरस्कार काल प्रदान करण्यात आले. यावेळी पद्मश्री डॉ. अभय बंग, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, सीएसआरडी संस्थेचे संचालक डॉ.सुरेश पठारे, नगरच्या औद्योगिक विकास प्रक्रियेचे मार्गदर्शक अरविंद पारगावकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.

# शेवगाव पंचायत समिती भ्रष्टाचाराच्या विळख्यात

## जय शिवसंग्राम आक्रमक; प्रलंबित कामांवरून आंदोलनाचा इशारा

### गटविकास अधिकारी यांच्या बदलीची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**एरंडगाव** : शेवगाव पंचायत समितीमार्फत राबविण्यात येणाऱ्या मनरेगा योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाची अनेक कामे मोठ्या प्रमाणात प्रलंबित असल्याचा आरोप जय शिवसंग्राम पक्षाचे जिल्हाध्यक्ष नवनाथ इसरवाडे यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी संबंधित खात्याला लेखी निवेदन देऊन तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

निवेदनानुसार, पंचायत समिती कार्यालयात वेळोवेळी पाठपुरावा करूनही अनेक कामे मार्गी लागत नसल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. विशिष्ट रक्कम दिल्यास कामे लवकर पूर्ण होतात, परंतु पैसे देण्यास नकार दिल्यास मंजूर असलेली कामेही कार्यालयीन कारणे सांगून प्रलंबित ठेवली जात आहेत, असा गंभीर आरोपही करण्यात आला आहे. तसेच ठेकेदारांची बिले टक्केवारी घेतल्याशिवाय मंजूर होत नसल्याची चर्चा असून, पंचायत समिती कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार सुरू असल्याचा आरोप निवेदनात नमूद करण्यात आला आहे.

या पार्श्वभूमीवर पंचायत समितीमार्फत झालेल्या सर्व कामांची सखोल चौकशी करून संबंधित बीडीओ यांची तात्काळ बदली करण्यात यावी व दोषी कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाध्यक्ष नवनाथ इसरवाडे यांनी केली आहे.

दरम्यान, प्रशासनाने याबाबत तातडीने कारवाई न केल्यास सोमवार, दिनांक २७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता पंचायत समिती शेवगाव येथील बीडीओ यांच्या दालनामध्ये ठिय्या आंदोलन करण्यात येईल, असा इशारा जय शिवसंग्राम पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे. या आंदोलनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीस प्रशासन जबाबदार राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

सदर निवेदन मा. तहसीलदार, शेवगाव यांना देण्यात आले असून, त्याची प्रत मा. ग्रामविकास मंत्री, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर, जिल्हाधिकारी अहिल्यानगर, पोलीस निरीक्षक शेवगाव व गटविकास अधिकारी पंचायत समिती शेवगाव यांना माहितीस्तव पाठविण्यात आली आहे.

## मंथन परीक्षेत नजन वस्ती शाळेच्या विद्यार्थिनींचे उज्वल यश

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**शेवगाव** : शेवगाव तालुक्यातील भातकुडगाव येथील नजन वस्ती शाळेच्या विद्यार्थिनींनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा नावलौकिक वाढविला आहे. मंथन वेलफेअर फाऊंडेशनतर्फे घेण्यात आलेल्या २०२६ च्या मंथन परीक्षेत विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी नोंदवली.

इयत्ता दुसरीतील साध्वी प्रविण पुंड हिने १५० पैकी १३६ गुण मिळवत जिल्ह्यात तिसरा क्रमांक, राज्यात आठवा क्रमांक आणि शेवगाव तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. तर इयत्ता चौथीतील अनुराधा अर्जुन गायकवाड हिने ३०० पैकी २८२ गुण मिळवत जिल्ह्यात पाचवा व राज्यात दहावा क्रमांक मिळवला असून तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

याशिवाय, अनुराधा गायकवाड हिने एनबी टॅलेंट सर्च परीक्षेत १५० पैकी ११४ गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. तसेच मिशन आरंभ परीक्षा २०२५-२६ मध्ये ३०० पैकी २९० गुण मिळवत तिने शेवगाव तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवला. तिच्या या यशाबद्दल शेवगाव येथे आयोजित सत्कार समारंभात गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या यशामागे शाळेतील शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शिक्षिका मनीषा गोरे व नीलकंठ लबडे यांनी अतिरिक्त तास घेऊन तसेच प्रश्नसंचांचा सराव करून विद्यार्थिनींना योग्य दिशा दिली.

विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल शाळा समिती अध्यक्ष योगेश नजन, सरपंच सरस्वती वाघमोडे, केंद्रप्रमुख विष्णू गायकवाड तसेच गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ यांनी कौतुक केले. दरम्यान, माजी विद्यार्थी इंजि. निखिल आहेर यांनी शाळेला प्रिंटर भेट दिला, तर २००८-०९ च्या इयत्ता चौथीच्या बॅचने साउंड सिस्टीम भेट देऊन शाळेप्रती आपले योगदान दिले.

## पाथर्डीत आठवडे बाजारामुळे वाहतूक ठप्प; नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी** : शहरातील वाढत्या नागरी समस्यांकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे. दर बुधवारी भरला जाणारा आठवडे बाजार नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असून, वसंतराव नाईक पुतळा ते संस्कार भवन चौक या मुख्य रस्त्यावर व्यापारी व शेतकरी थेट रस्त्यावर बसून विक्री करत असल्यामुळे वाहतुकीचा पूर्णपणे खोळंबा होत आहे. परिणामी, बाजारतळावर बसणाऱ्या मूळ व्यापाऱ्यांनाही मोठा फटका बसत आहे.



नोकरदार वर्ग व शेतकऱ्यांच्या सोयीसाठी रविवारीही भाजी बाजार भरू लागल्याने शहरात आठवड्यात दोन दिवस बाजाराचा ताण निर्माण झाला आहे. मढी, माणिकदौंडी परिसरातून शहरात येणारी वाहने कमी अंतराचा पर्याय म्हणून संस्कार भवन चौकातून प्रवेश करतात. मात्र, रस्त्याच्या दोन्ही बाजूंना उभ्या असलेल्या वाहनांमुळे आणि रस्त्यावर मांडलेल्या पथाऱ्यांमुळे हा मार्ग बुधवारी दिवसभर आणि रविवारी दुपारपर्यंत अघोषितपणे बंदच राहतो. यामुळे वाहतुकीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या मार्गावर गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल आणि गुगळे बाल रुग्णालय यांसारख्या महत्त्वाच्या संस्था असूनही, सकाळपासूनच लाऊडस्पीकरचा आवाज, गर्दी आणि कोंडी यामुळे विद्यार्थ्यांना व रुग्णांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे तालुकाध्यक्ष संतोष जिरेसाळ, जिल्हाध्यक्ष अविनाश पालवे, शहराध्यक्ष संदीप काकडे तसेच महिला शहराध्यक्ष रेणुका ताई फुलशेटे आणि बाजारकरी शिष्टमंडळातील मुकुंद लोहिया, विनोद खटावकर, एकनाथ भंडारी, राहुल कुसळकर, अनिल लाटे, योगेश काकडे, हरीश बाफना, मनोज डोळस, मयूर काकडे, नागेश काकडे, काळे पाटील आदींनी नगराध्यक्ष अभय आव्हाड यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## गणेश चव्हाण ठरला कर्जतच्या राजमुद्रा केसरीचा मानकरी

### दादा माने याने पटकावला कर्जत केसरीचा किताब




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कर्जत** : कर्जत येथे भास्कर तोरडमल आणि दिलीप तोरडमल बंधूच्या पुण्यतिथीनिम्मित भरविण्यात आलेल्या कुस्ती मैदानात गणेश चव्हाण याने अक्षय माळी याच्यावर ढाक डावावर मात करीत अस्मान दाखवत कर्जतच्या राजमुद्रा केसरीवर आपले नाव कोरले.

२०१३ पासून कै भास्करदादा व दिलीपनाना गुलाबराव तोरडमल यांच्या पुण्यतिथीनिमित्त कर्जत येथे कुस्त्यांचे मैदान भरवले जाते.

सोमवार, दि २० रोजी कर्जत येथे बहिरोबावाडी येथील भास्कर व दिलीप तोरडमल या बंधूंच्या पुण्यतिथीनिम्मित निकाली कुस्त्यांचे जंगी मैदान आयोजित करण्यात आले होते. यात राजमुद्रा केसरी व कर्जत तालुका केसरी कुस्ती स्पर्धा घेण्यात आली. राजमुद्रा केसरीसाठी पैलवान गणेश चव्हाण आणि अक्षय माळी यांच्यात लढत झाली. दोन्ही मल्लांनी चित्तथरारक कुस्ती करीत असताना गणेश चव्हाण याने ढाक या डावावर माळी यास चितपट करीत यंदाच्या राजमुद्रा केसरीवर आपले नाव कोरले. त्यास राजमुद्रा केसरीचा किताब, मानाची दोन किलो चांदीची गदा मान्यवरांच्या उपस्थितीत देण्यात आली. यासह कर्जत केसरी किताबासाठी पैलवान दादा माने आणि धुलाजी इरकर यांच्यात अंतिम लढत पार पडली. या लढतीत अंतिम क्षणी दादा माने याने इरकरवर गुणांक फरकाने विजय मिळवत कर्जत केसरीचा किताब पटकावला. प्रेक्षणीय कुस्तीत डबल महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर याने हरियाणा केसरी मनजीत सिंग यास निकाल डावावर चितपट करून मैदान गाजवले. या मैदानात कै.पै.दिलीपनाना तोरडमल क्रीडा संकुलातील पैलवान बिरू इरकर, अवि माने, सुयोग माने, यश धोदाड, आबा परदेशी, कुलदीप परदेशी, मयूर खरात, शंभू बिडगर, नारायण खेडकर, प्रणव मोहोळकर, वैभव मासाळ, सोहम गोयकर, शंभू जाधव, आदित्य परदेशी, जियान शेख, सोहम समुद्र, अर्जुन गाडे, अमोल गाडे, या मल्लांनी प्रेक्षणीय कुस्त्या करीत प्रेक्षकांची मने जिंकली. या मैदानासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भाऊसाहेब जंजिरे यांच्यासह आशिष बर्गे, बहिरोबावाडीचे सरपंच शरद यादव, उद्योजक सुधीर यादव, योगेश राजेजाधव, राहुल पवार, प्रवीण घुले, नामदेव राऊत, बाळासाहेब साळुंके, ओम कुलथे, तुषार काकडे, अक्षय राऊत, अशोक तोरडमल, संतोष काळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेशआबा तोरडमल आणि अनिल तोरडमल यांनी केले तर आभार डॉ राजेश तोरडमल आणि इंजिनिअर अमित तोरडमल यांनी मानले.

कुस्ती मैदानासाठी पंच म्हणून निलेश मदने, संभाजी निकाळजे, गणेश जाधव, मयूर रोहकले यांनी काम पाहिले तर मैदान यशस्वीतेसाठी विजयकुमार तोरडमल, वस्ताद ईश्वर तोरडमल, धरमसिंग परदेशी, किरण समुद्र, महेंद्र धोदाड, अजय नेटके, विकास तोरडमल, किरण नलावडे, गणेश शेळके, अजित शेळके, तुषार जगताप, राहुल मांडगे, वैभव पवार, बापू तोरडमल यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जि.प.शाळा मढेवडगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**लिंपणगाव** : श्रीगोंदा तालुक्यातील जि. प.प्राथ. शाळा मढेवडगाव शाळेत कलाविष्कार सादर करून चिमुकल्यांचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या जल्लोषात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून श्री विठ्ठल आप्पा नागवडे व सरपंच श्री प्रमोद जी शिंदे ,डॉक्टर अनंत पवार, उपजिल्हाधिकारी शिंदे साहेब, स्मितल भैया वाबळे होते. यावेळी श्री निळकंठ बोरूडे साहेब श्री भुकन साहेब आमचे मार्गदर्शक श्री आबासाहेब जगताप, संतोष गायकवाड, अविनाश निंभोरे उपसरपंच सौ. सुनिता उंडे व सर्व सोसायटी व ग्रामपंचायतचे आजी-माजी सदस्य, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सोमनाथ फरकांडे ,उपाध्यक्ष व सर्व आजी-माजी सदस्य, शिक्षणप्रेमी पालक, ज्येष्ठ व प्रतिष्ठित नागरिक , तरुण वर्ग, व्यावसायिक, शिक्षक शिक्षिका व सर्व माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापिका श्रीमती वनिता नलगे यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक राजू शिर्के मीना चाकणे, मंगल पानसरे सुवर्णा बारस्कर यांनी विशेष परिश्रम घेऊन सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवरांचे आभार मुख्याध्यापिका श्रीमती वनिता नलगे मॅडम यांनी मानले.




# नवीन पेन्शन चहासाठी पण पुरत नाही : सुदाम वराट

## * जामखेडमध्ये कर्मचारी संपामुळे शाळा, शासकीय कार्यालये ओस
## * एकच मिशन जुनी पेन्शन च्या घोषणेने दुमदुमला परिसर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

जामखेड : आमदार-खासदार यांनी शपथ घेतली की आयुष्य भर पेन्शन मिळते पण कर्मचारी तीस वर्षे सेवा करूनही पेन्शन मिळत नाही ही मोठी शोकांतिका आहे. काही कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत पेन्शन १५०० ते अठराशे रूपये मिळत आहे. यात कसा घरखर्च भागवयाचा मिळणारी पेन्शन चहा साठी सुद्धा पुरणार नाही असे मत माध्यमिक शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष सुदाम वराट यांनी व्यक्त केले.

जुनी पेन्शन योजना लागू करण्यासह इतर प्रलंबित मागण्यांसाठी आज मंगळवार २१ एप्रिलपासून राज्यव्यापी संपाची हाक देण्यात आली या संपात राज्यातील तब्बल १७ लाख कर्मचारी सहभागी झाले आहेत. जामखेड तालुक्यातील शिक्षक, शिक्षकेत्तर, आरोग्य, महसूल यासह अनेक विभागातील कर्मचारी सहभागी झाले आहेत. यामुळे आज दिवसभर शाळा, तहसील कार्यालय, कृषी, आरोग्य विभागाची कार्यालये ठप्प झाले होते. मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत संप सुरूच राहणार असा निर्धार समन्वय समितीच्या वतीने व्यक्त करण्यात आला.



आज माध्यमिक शिक्षक सकाळी दहा वाजता ल. ना. होशिंग विद्यालयात जमा झाले व समुहाने एकत्रित तहसील कार्यालयात जमा झाले. समन्वय समिती चे अध्यक्ष मच्छिंद्र पाडळे यांना निवेदन देण्यात आले. यावेळी माजी अध्यक्ष पी. टी. गायकवाड, माध्यमिक शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष सुदाम वराट, सचिव संतोष पवार, उपाध्यक्ष जाकिर शेख, सहसचिव भागवत चांगुणे, अमोल भोंडवे, खजिनदार हनुमंत वराट, भाऊसाहेब इथापे, रामेश्वर धुमाळ, अर्जुन रासकर, सुनील घाडगे, मयूर भोसले, विशाल पोले, आदित्य देशमुख, दिनकर सरगर, बुवासाहेब दहिकर, शिक्षकेत्तर संघटनेचे तालुकाध्यक्ष संतोष देशमुख, बाबासाहेब धनवडे, महसूलचे नंदुरबार गव्हाणे, आरोग्य विभागाचे गर्जे, यांच्या सह माध्यमिक शिक्षक, महसूल कर्मचारी, आरोग्य कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना जाकिर शेख म्हणाले की, विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सरकारी-निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आज पासून बेमुदत संपावर जात आहोत. मागण्या मान्य होईपर्यंत संप सुरूच राहिल.

यावेळी बोलताना शिक्षकेत्तर संघटनेचे तालुकाध्यक्ष संतोष देशमुख म्हणाले की सध्या कर्मचारी भरती बंद आहे यामुळे खुपच ताण निर्माण होत आहे. ताबडतोब जुनी पेन्शन व कर्मचारी भरती करावी अशी मागणी केली.यावेळी तहसीलदार तथा समन्वय समितीचे अध्यक्ष मच्छिंद्र पाडळे म्हणाले की, शासकीय कर्मचारी, शिक्षक संपात सहभागी आहेत यामुळे कामकाज ठप्प झाले आहे. आलेले निवेदन शासनाकडे पाठवले जाईल असे सांगितले. यावेळी एकच मिशन जुनी पेन्शन यासह

दीर्घकाळ आंदोलन, संप आणि निवेदनांनंतरही शासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत नसल्याचा आरोप करत कर्मचाऱ्यांनी आता निर्णायक लढ्याची तयारी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर जामखेड तालुक्यातील सर्व कार्यालये शाळा ओस पडल्या होत्या.

या प्रमुख मागण्यांसाठी संपाची हाक कर्मचारी संघटनांनी जुनी पेन्शन योजना लागू करणे, सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची तात्काळ अधिसूचना, कंत्राटी व रोजंदारी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे करणे, चतुर्थश्रेणी व वाहनचालक भरतीवरील बंदी उठविणे, कैशलेस आरोग्य सुविधा, अनुकंपा नियुक्त्या, पीएफआरडीए कायदा रद्द, तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर निर्णय घेण्याची मागणी केली आहे. याशिवाय कर्तव्य बजावताना कर्मचाऱ्यांवरील हल्ल्यांविरोधात आयपीसी कलम ३५३ अजामिनपात्र करण्याची मागणी, तसेच नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण आणि १५ मार्च २०२४ च्या संच मान्यता शासन आदेशाचा पुनर्विचार करण्याची मागणीही आंदोलनाच्या केंद्रस्थानी आहे. अशा मागण्या सह अनेक मागण्या साठी संप पुकारण्यात आला आहे. जामखेड तालुक्यातील कार्यालये व शाळा यावर मोठा परिणाम दिसून आला कार्यालये व शाळा ओस पडल्या होत्या.

द • ख • ल

## राजकीय परिस्थितीत प्रामाणिकपणे काम करणारे तरुण पुढे यावेत : अॅड. खाडे

**माळशिरस :** सध्याची राजकीय परिस्थिती जातीयवाद व पैशाच्या वापरामुळे गढूळ होत आहे. या पार्श्वभूमीवर शिकलेले तरुण व कामसु आणि वेळ देणारे तरुण पुढे यावेत असे विचार सासवड वकील संघटनेचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ विधीज्ञ अॅड.अण्णासाहेब खाडे यांनी व्यक्त केले. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदर च्या वतीने सहसचिव गौरव विजयराव कोलते यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय कोलते होते. युवा नेते गौरव कोलते सत्काराला उत्तर देताना म्हणाले की, निवडणुकीत यश - अपयश येत राहते. अपयशाने खचून न जाता पुन्हा जनतेच्या सेवेत सक्रिय राहू. कार्यक्रमात सर्वांचे स्वागत बंडूकाका जगताप यांनी केले. प्रास्ताविक प्रतिष्ठानचे सचिव शांताराम पोमण यांनी केले. अॅड. दिलीप निरगुडे, अॅड. कला फडतरे, डॉ.जगदीश शेवते, विठ्ठल जगताप, भानुदास कुंभारकर, मुरलीधर झूरंगे, माऊली मेमाणे, डॉ.राजेश दळवी , अरुण यादव यांनी शुभेच्छा दिल्या. सदरील कार्यक्रमास मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुरंदर पत्रकार संघाचे अध्यक्ष योगेश कामथे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले.




## बारामती विधानसभा पोटनिवडणुकीसाठी कर्मचाऱ्यांना भरपगारी सुट्टी जाहीर

**बारामती :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, महाराष्ट्र विधानसभेच्या २०१-बारामती मतदारसंघासाठी दि. २३ एप्रिल २०२६ रोजी पोटनिवडणूक घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदारांना आपला मतदानाचा हक्क निर्भय व सुलभरीत्या बजावता यावा, यासाठी संबंधित मतदारांना भरपगारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या आदेशानुसार, बारामती मतदारसंघातील मतदार असलेले कामगार, अधिकारी व कर्मचारी हे कामानिमित्त मतदान क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरी त्यांना मतदानाच्या दिवशी पगारी सुट्टी देणे बंधनकारक राहणार आहे. सदर सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापनांना लागू राहील. यामध्ये खाजगी कंपन्या, दुकाने, हॉटेल्स, खाद्यगृहे, नाट्यगृहे, शॉपिंग मॉल्स, आयटी कंपन्या तसेच विविध व्यापारी व औद्योगिक आस्थापनांचा समावेश आहे.दरम्यान, अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसल्यास, संबंधित कर्मचाऱ्यांना मतदानासाठी किमान दोन ते तीन तासांची विशेष सवलत देणे आवश्यक राहील. याची जबाबदारी संबंधित आस्थापना मालकांवर असेल.मतदानासाठी आवश्यक सुट्टी अथवा सवलत न दिल्यामुळे कर्मचारी मतदानापासून वंचित राहिल्यास, संबंधित आस्थापनांविरुद्ध प्रशासनाकडून कडक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

## मतदार छायाचित्र ओळखपत्र नसल्यास अन्य १२ प्रकारचे पुरावे ग्राह्य- उत्तम दिघे

**बारामती :** मतदान करण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने मतदार छायाचित्र ओळखपत्र जवळ नसल्यास अन्य १२ पुरावे ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले असून त्यापैकी कोणताही एक मूळ पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येईल, अशी माहिती बारामती विधानसभा पोटनिवडणूक निर्णय अधिकारी उत्तम दिघे यांनी दिली आहे. मतदान केंद्रात मोबाईल घेऊन जाण्यास बंदी असल्याचेही ते म्हणाले. मतदारांची ओळख पटविण्यासाठी निवडणूक आयोगाने निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. यामध्ये आधार कार्ड, मनरेगा अंतर्गत निर्गमित करण्यात आलेले रोजगार ओळखपत्र (जॉब कार्ड), बँक किंवा टपाल कार्यालयाने दिलेले छायाचित्र असलेले पासबुक, श्रम मंत्रालयाच्या योजनेंतर्गत दिलेले आरोग्य विमा स्मार्ट कार्ड, वाहन चालक परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स), स्थायी खाते क्रमांक (पॅन कार्ड), राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणी अंतर्गत भारताचे महानिबंधक (आरजीआय) यांनी दिलेले स्मार्ट कार्ड, भारतीय पारपत्र (पासपोर्ट), छायाचित्र असलेली निवृत्ती वेतनविषयक कागदपत्रे, केंद्र अथवा राज्य शासन, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, सार्वजनिक मर्यादित कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना दिलेले, छायाचित्र असलेले सेवा ओळखपत्र, संसद, विधानसभा, विधानपरिषदेच्या सदस्यांना वितरित केलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तिकरण मंत्रालयाच्यावतीने दिव्यांग व्यक्तींना वितरित केलेले विशेष ओळखपत्र या १२ पुराव्यांचा

# खामुंडीत परिसरात कांदा काढणीला वेग

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** खामुंडी (ता. जुन्नर )परिसरात कांदा काढणीला वेग आला आहे. तीव्र उन्हाच्या झळा सोसून शेतमजूर कांदा काढणीचे काम करीत आहे. डोईवर सूर्य आग ओकत असताना पोटाची खळगी भरण्यासाठी तीव्र उन्हात दिवसभर राबून शेतमजूर कांदा काढणी करीत आहेत.उन्हाच्या झळ्या सोसून एकरी ७० ते ८० हजार रुपये उत्पादन खर्च येणाऱ्या कांदा पिकाला मात्र अगदीच नीचांकी बाजारभाव मिळत आहे. बाजार समितीच्या ओतूर उपबाजारात रविवारी (दि. १९) १८ हजार ५५५ पिशव्यांची आवक झाली. गोळा कांद्याला अवघा ११ ते १२ रुपये प्रतिकिलो बाजारभाव मिळाला, अशी माहिती बाजार समितीचे व्यवस्थापक दीपक मस्करे यांनी दिली.




अवकाळीची धास्ती व कांद्याचे बाजारभाव वाढण्याच्या शक्यतेने शेतकऱ्यांनी कांदा चाळीत खामुंडी परिसरात उन्हात सुरू असलेली कांदा काढणी. साठविण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. अद्याप भांडवल कर्जाऊ घेतल्याने त्याचे व्याजदर वाढते आहे, भविष्यात कांद्याचे बाजारभाव वाढतील याची कोणतीही शाश्वती राहिलेली नाही तरीही हाताशी इतर कोणतीही आर्थिक आवक येण्याजोगे पीक नसल्यामुळे भाव कोसळलेला कांदा जिवापाड जपण्याचा आटापिटा शेतकरीवर्ग करीत आहे. कांद्याला मिळत असलेल्या ११रु ते १२रुपये च्या बाजारभावात उत्पादन खर्चही निघत नाही. असेच नीचांकी बाजारभाव राहिल्यास शेतकरी व शेती व्यवसाय कोलमडून पडणार आहे.

## शंकर महाराज यांच्या ७९ व्या समाधी दिनानिमित्त भव्य कार्यक्रम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**कवठे येमाई :-** पुणे जिल्ह्यातील शिरूर (घोडनदी) येथे चैतन्य सद्गुरू योगीराज श्री शंकर महाराज यांच्या ७९ व्या समाधी दिनानिमित्त शुक्रवार, दि. २४ एप्रिल २०२६ रोजी भक्तिभावाने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पवित्र सोहळ्यामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून,भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या निमित्ताने सायंकाळी ५ वाजता भक्ती संगीताचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर सायंकाळी ७ वाजता श्रींच्या पोथी वाचनाचा कार्यक्रम होणार असून, रात्री ८ वाजता श्रींची आरती व महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडणार आहे.हा कार्यक्रम तिळवण तेली समाज मारुती मंदिर, मुंबई बाजार, शिरूर (घोडनदी), जि. पुणे येथे संपन्न होणार आहे. आयोजकांनी सर्व भाविकांनी सहपरिवार उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा,असे आवाहन केले आहे.या कार्यक्रमाचे सुयोग्य आयोजन श्री. चैतन्य सद्गुरू श्री शंकर महाराज सेवाभावी प्रतिष्ठान, शिरूर तसेच समस्त भक्त परिवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.समाधी दिनानिमित्त भाविकांसाठी महाप्रसादाचीही व्यवस्था करण्यात आली असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# नाझरे सुपे येथे शेतकऱ्यांची सुरळीत वीजपुरवठ्यासाठी मागणी

### खंडित वीजपुरवठ्यामुळे पिकांचे नुकसान; सिंगल फेज वेळ बदलण्याची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**'सासवड :** पुरंदर तालुक्यातील नाझरे सुपे येथील शेतकऱ्यांना मागील पंधरा दिवसांपासून खंडित वीजपुरवठ्याचा मोठा फटका बसत असून पिकांचे नुकसान होत आहे. याबाबत नाझरे सुपे सबस्टेशन येथे सरपंच भाऊसो दत्तात्रय कापरे यांच्या सहीने निवेदन देऊन वीजपुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली आहे.



यावेळी राहुल कापरे, सतीश कापरे, सुनील कापरे, दीपक कापरे, सौरभ कापरे, गुलाब कापरे, नारायण कापरे, सचिन कापरे, संतोष कापरे, हरीश कापरे, पंढरीनाथ कापरे, शिवाजी कापरे, उल्हास कापरे, किरण कदम, आपासो कापरे आदी शेतकरी उपस्थित होतेगावातील शेतकरी शेतीवर अवलंबून असून वीजपुरवठा अनियमित झाल्यामुळे पिकांना वेळेवर पाणी देता येत नाही. त्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे नाझरे सुपे येथील सबस्टेशनवर महावितरण अधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनाद्वारे वीजपुरवठा तातडीने सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली आहे सध्या सिंगल फेज वीजपुरवठा संध्याकाळी दिला जात असल्यामुळे शेतकऱ्यांना अडचणी येत आहेत. त्यामुळे हा पुरवठा थ्री फेज व सिंगल फेज मध्ये दिवसा देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

> वीजपुरवठा सुरळीत झाला नाही तर पिकांचे मोठे नुकसान होईल. प्रशासनाने तातडीने निर्णय घ्यावा.
> वीजपुरवठा सुरळीत न झाल्यास शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असून प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## हरगुडे गावची ग्रामदेवता श्री जानाई देवीचा शुक्रवार शनिवार यात्रा महोत्सव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** पुरंदर तालुक्यातील हरगुडे गावची ग्रामदेवता श्री जानाई देवीचा पारंपारिक यात्रा उत्सव वैशाख शुद्ध अष्टमी व नवमी म्हणजेच येत्या २४ व २५ एप्रिलला (शुक्रवार शनिवार) साजरा होत असून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवारी पहाटे देवीची अभिषेक व महापुजा होऊन यात्रेचा प्रारंभ होईल. सकाळी नऊ ते चार पर्यंत गावातील महिलांचा नवसफेड व सवासिनींचा कार्यक्रम पार पडणार आहे . सायंकाळी चार वाजता देवीला ग्रामस्थांची मानाची साडी चोळी झाल्यावर प्रथेप्रमाणे




देवीची काठी वाजत गाजत श्री नृसिंह भेटीला मार्गस्थ होईल. सायंकाळी विविध गावच्या ढोल लेझीम संघाचा छबीना मंदिराच्या पटांगणात पार पडणार आहे.मध्यरात्री उत्सवमूर्ती श्री जानाई देवीची पालखीतून फटाक्यांच्या आतषबाजीत, गुलालाची उधळण करत सवाद्य ग्राम प्रदक्षिणा संपन्न होणार आहे. शुक्रवारी मध्यरात्री निलेशकुमार अहिरेकर सह रुपाली पुणेकर यांचा लोकनाट्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. शनिवारी सायंकाळी चार वाजता कुस्त्यांचा जंगी आखाडा होणार असल्याचे यात्रा समितीच्या वतीने सांगण्यात आले. रविवारी योगेश देशमुख निर्मित युवा लावणी सम्राज्ञी पुनम कुडाळकर यांच्या '' तुमच्यासाठी काय पण'' हा ऑर्केस्ट्रा सादर होणार आहे. हरगुडे गावच्या यात्रेने तालुक्यातील सर्व गावांच्या यात्रेची सांगता होत असल्याचे सांगण्यात आले.

# जर्मनीत 'ज्ञानोबा-तुकाराम'चा जयघोष विठ्ठल धामात संतांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर जर्मनीतील रेमबोल्डशॉसर स्ट्रासे, किर्चहेम येथील विठ्ठल धाम मंदिरात संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या मूर्तींची रविवारी (ता. १९) विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात हा सोहळा अत्यंत भक्तिमय वातावरणात पार पडला. आळंदी व देहू संस्थानच्या वतीने आयोजित या सोहळ्यासाठी भारतातून तब्बल ३५ वारकरी सहभागी झाले होते. याशिवाय जर्मनीतील स्थानिक मराठी व जर्मन नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. आळंदी व



देहू येथून गुरुवारी (ता. १६) संतांच्या मूर्ती जर्मनीकडे रवाना करण्यात आल्या होत्या. विठ्ठल धामात पोहोचल्यानंतर दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी (ता. १८) सकाळी काकड आरतीने कार्यक्रमाची सुरुवात झाली, तर दुपारी दिंडी काढण्यात आली. दिवसाची सांगता नमो ज्ञानेश्वरा या संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या जीवनावर आधारित इंग्रजी कार्यक्रमाने झाली. सकाळी ७.३० वाजल्यापासून प्राणप्रतिष्ठा विधींना प्रारंभ झाला. ज्ञानोबा-तुकारामच्या नामघोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. सर्व विधी अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडले.

यावेळी आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी इंग्रजीतून कीर्तन केले. तसेच या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण सोशल मीडियावर करण्यात आले. कार्यक्रमास देहू संस्थानचे माजी अध्यक्ष नितीन महाराज मोरे, सुनील महाराज मोरे तसेच स्वामी समर्थ प्रतिष्ठान औंधचे श्रीकांत पाटील उपस्थित होते. जर्मन भाविकांमध्ये भक्तीची रुजवात दोन दिवस चाललेल्या काकड आरती, पूजा व इतर धार्मिक विधींमध्ये जर्मन नागरिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. त्यांच्या भक्तिभावामुळे ज्ञानोबा-तुकारामच्या भक्तीची गोडी जर्मन भाविकांनाही लागल्याचे डॉ.भावार्थ देखणे यांनी सांगितले.

# सासवड नगरपरिषदेकडून दिव्यांगांसाठी पाच टक्के निधीचे वितरण

### १९६ लाभार्थ्यांच्या खात्यात थेट रक्कम; नगराध्यक्षा आनंदी जगताप यांच्या हस्ते धनादेश वाटप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**''नाझरे सुपे :** सासवड नगरपरिषदेकडून २०२५-२६ या आर्थिक वर्षात दिव्यांग कल्याणासाठी राखीव ठेवलेल्या ५ टक्के निधीचे वितरण करण्यात आले असून, एकूण १९६ पात्र दिव्यांग लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत सुमारे २२ लाख ७७ हजार रुपयांचा निधी वितरित करण्यात आला. नगराध्यक्षा आनंदी जगताप यांच्या हस्ते नगरपरिषद कार्यालयात आयोजित कार्यक्रमात लाभार्थ्यांना प्रतीकात्मक धनादेश वाटप करण्यात आले.

सासवड नगरपरिषदेकडून दरवर्षीप्रमाणे यंदाही दिव्यांग नागरिकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी ५ टक्के निधी राखीव ठेवण्यात आला होता. या निधीचा वापर पारदर्शक पद्धतीने लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्यासाठी करण्यात आला. त्यामुळे लाभार्थ्यांना आर्थिक मदत वेळेत आणि सुरक्षिततेत्या मिळाली आहे.



सासवड नगरपरिषद कार्यालयात दिव्यांग लाभार्थ्यांना ५% निधीअंतर्गत प्रतीकात्मक धनादेश वाटप प्रसंगी नगराध्यक्षा आनंदी जगताप यांच्यासमवेत गटनेते अजित जगताप, आरोग्य सभापती राजन जगताप, पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, बांधकाम सभापती माऊली जगताप, माजी उपनगराध्यक्ष यशवंत जगताप, नगरसेवक प्रदीप राऊत व दिव्यांग बांधव उपस्थित.

नगरपरिषदेकडे प्राप्त झालेल्या अर्जांच्या छाननीनंतर एकूण १९६ पात्र दिव्यांग नागरिकांची निवड करण्यात आली. प्रत्येक लाभार्थ्याला सुमारे ११ हजार ७२४ रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. या संदर्भात नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेत सर्वानुमते निर्णय घेण्यात आला होता.

दि. २० एप्रिल २०२६ रोजी सासवड नगरपरिषद कार्यालयात आयोजित कार्यक्रमात शहरातील लाभार्थ्यांना धनादेशांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने दिव्यांग नागरिक उपस्थित होते. या उपक्रमामुळे लाभार्थ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, नगरपरिषदेचे सदस्य तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी दिव्यांग नागरिकांसाठी अशा योजनांचे महत्त्व अधोरेखित केले.

या उपक्रमामुळे दिव्यांग नागरिकांना आर्थिक आधार मिळाल्याने त्यांनी नगरपरिषदेचे आभार व्यक्त केले. भविष्यातही अशाच योजना राबवून अधिकाधिक लाभार्थ्यांपर्यंत मदत पोहोचवावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शनाने करण्यात आला. सासवड नगरपरिषदेकडून राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमामुळे सामाजिक बांधिलकी जपली जात असून, शहरातील दिव्यांग नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे.

> 'दिव्यांग नागरिकांचे सक्षमीकरण आणि त्यांना आर्थिक बळ देणे हे नगरपरिषदेचे कर्तव्य आहे. अशा योजना पुढेही सातत्याने राबविण्यात येतील,'' असे नगराध्यक्षा आनंदी जगताप यांनी सांगितले.

# पुणे जिल्हा परिषदेकडून डिजिटल परिवर्तनाला वेग

### नागरिकांसाठी सर्व सेवा आता एका क्लिकवर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**''नाझरे सुपे :** ग्रामीण भागातील प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने पुणे जिल्हा परिषदेकडून अद्ययावत व सर्वसमावेशक डिजिटल संकेतस्थळ कार्यान्वित करण्यात आले आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांच्या नेतृत्वाखाली साकारलेल्या या उपक्रमामुळे जिल्ह्यातील प्रशासनात डिजिटल परिवर्तनाची नवी दिशा मिळाली असून, नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच व्यासपीठावर उपलब्ध होणार आहेत.

डिजिटल युगाशी सुसंगत पाऊल उचलत जिल्हा परिषद प्रशासनाने ई-गव्हर्नन्स प्रणालीचा व्यापक अवलंब केला आहे. नव्या संकेतस्थळामध्ये 'इंटिग्रेटेड जिल्हा परिषद डॅशबोर्ड' आणि 'इंटेलिजंट वेस्ट मॅनेजमेंट सिस्टीम' यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करण्यात आला आहे. या प्रणालींच्या साहाय्याने विकासकामांचे नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेख अधिक अचूक व वेगवान पद्धतीने करता येणार आहे. त्यामुळे कामकाजातील विलंब कमी होऊन प्रशासन अधिक जबाबदार बनण्यास मदत होणार आहे.

नागरिकांच्या दैनंदिन गरजा लक्षात घेऊन विविध शासकीय योजनांची माहिती सुलभ भाषेत उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण), महात्मा गांध राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा), कृषी अनुदान योजना, शिक्षणविषयक उपक्रम तसेच समाजकल्याण विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती या संकेतस्थळावर पाहता येणार आहे. यामुळे नागरिकांना योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक माहिती सहज मिळणार असून, कार्यालयीन फेऱ्यांची गरज मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

आरोग्य, शिक्षण, सार्वजनिक बांधकाम, महिला व बालकल्याण तसेच इतर विभागांशी संबंधित अद्ययावत माहितीही संकेतस्थळावर उपलब्ध आहे. ग्रामीण भागातील शाळांची माहिती, आरोग्य केंद्रांची स्थिती, सुरू असलेली विकासकामे आणि विविध उपक्रमांची माहिती नागरिकांना पारदर्शक पद्धतीने पाहता येणार आहे.

शासनाच्या पारदर्शकता धोरणाअंतर्गत विविध विभागांची आर्थिक माहिती, मंजूर अर्थसंकल्प, खर्चाचा तपशील तसेच महत्त्वाच्या सूचना संकेतस्थळावर नियमितपणे प्रकाशित करण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रशासनातील पारदर्शकता वाढून नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निवारण व्हावे यासाठी ऑनलाइन तक्रार निवारण प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. या माध्यमातून नागरिकांना थेट तक्रार नोंदवता येणार असून, त्यावर वेळेत कार्यवाही होणार आहे. याशिवाय 'लोकशाही दिन' उपक्रमासंदर्भातील माहिती उपलब्ध करून देण्यात आली असून, नागरिकांना प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची संधी मिळणार आहे.

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तातडीने मदत मिळावी यासाठी सिटीझन कॉल सेंटर (१५५३००), आपत्कालीन सेवा (११२) तसेच महिला व बाल हेल्पलाईन क्रमांक संकेतस्थळावर स्पष्टपणे देण्यात आले आहेत. यामुळे आपत्कालीन प्रसंगी योग्य मार्गदर्शन आणि मदत मिळणे अधिक सोपे होणार आहे.

संकेतस्थळ सर्वसमावेशक बनविण्याच्या दृष्टीने अपंग व्यक्तींसाठी 'टेक्स्ट-टू-स्पीच'सारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे दृष्टिहीन किंवा वाचनात अडचण असलेल्या नागरिकांनाही या सेवांचा लाभ घेता येणार आहे.

प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान करण्यासाठी ई-ऑफिस प्रणालीचा प्रभावी वापर सुरू करण्यात आला आहे. कागदपत्रांची देवाणघेवाण डिजिटल माध्यमातून होत असल्यामुळे वेळेची बचत होत असून, पत्रव्यवहारातील विलंब मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. वरिष्ठता याद्या, परिपत्रके, आदेश आणि विविध सूचना संकेतस्थळावर तत्काळ उपलब्ध होत असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कामकाज अधिक सुसूत्र झाले आहे.

याशिवाय जिल्हा परिषद सदस्यांनाही ई-ऑफिस प्रणालीमध्ये समाविष्ट करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यामुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वय अधिक मजबूत होणार आहे. निर्णय प्रक्रियेला वेग येऊन विकासकामांच्या अंमलबजावणीस गती मिळणार आहे.

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याचा हा प्रयत्न असून, 'स्मार्ट जिल्हा परिषद' उभारण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना सुलभ, जलद आणि पारदर्शक सेवा मिळण्याबरोबरच प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होणार असल्याचे जिल्हा परिषदेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# उष्णतेत चिमण्यांसाठी धावली पिंपरी दुमाला शाळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पाबळ :** तालुक्यातील पिंपरी दुमाला येथील जिल्हा परिषद शाळेत वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर चिमण्यांच्या संवर्धनासाठी अनोखा उपक्रम राबविण्यात आला. शिरूर तालुका पर्यावरण मंडळाच्या चिमणी संवर्धन अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत चिमण्यांसाठी कृत्रिम घरटी तयार केली.



विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत स्वतःच्या हस्ते तयार केलेली घरटी शाळेच्या परिसरातील झाडांवर तसेच इमारतीच्या विविध ठिकाणी बसविण्यात आली. त्यामुळे कडाक्याच्या उन्हात चिमण्यांना सुरक्षित निवारा उपलब्ध होणार आहे. या उपक्रमामुळे पर्यावरण संवर्धनाचा संदेशही प्रभावीपणे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचत आहे.

ाळेचा परिसर हिरवाईने नटलेला असला तरी वारा व पावसामुळे नैसर्गिक घरटी वारंवार खाली पडत असल्याचे निदर्शनास आले. यावर उपाय म्हणून कायमस्वरूपी कृत्रिम घरटी बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. पर्यावरण मंडळाचे कार्याध्यक्ष प्रवीणकुमार जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली नैसर्गिक साधनांचा वापर करून ही घरटी तयार करण्यात आली.

यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चिमण्यांचे पर्यावरणातील महत्त्व, त्यांची घटती संख्या आणि संरक्षणाची गरज याबाबत मार्गदर्शन केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण होत असून समाजातही सकारात्मक संदेश पोहोचत आहे. डाक्याच्या उन्हात पक्ष्यांसाठी उभा राहिलेला हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

द•ख•ल



## स्व. अरुणकाका जगताप स्मृतीदिनानिमित्त भिंगारला वृक्षारोपण

**अहिल्यानगर** : हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील छावणी परिषदेच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. याचबरोबर उद्यान परिसरात स्वच्छता अभियान राबवून परिसर स्वच्छ करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आणि सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम पार पडला.

स्व. अरुणकाका जगताप यांच्या पहिल्या स्मृतीदिनानिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेत समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला होता. त्यांच्या सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या हस्ते स्व. अरुणकाका जगताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महेंद्र जाधव सर व मीनाताई परदेशी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी निताताई देवराईकर, ज्योतीताई भिंगारदिवे, प्रांजली सपकाळ, मिनाताई रासणे, जाइताई बहिरट, सुभद्राताई लंगोटे, सचिन चोपडा, सि.ए. रविंद्र कटारिया, जहिर सय्यद, सर्वेश सपकाळ, संजय भिंगारदिवे, दिलीपराव ठोकळ, दिपकराव धाडगे, अशोक पराते, ज्ञानेश्वर धोत्रे, सुदामराव गांधले, तुषार घाडगे गुरुजी, विनोद खोत, विशाल भामरे, अनिल हळगावकर आदींसह ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ७५ पार महिलांचा उत्साहपूर्ण सत्कार



**अहिल्यानगर** – १२ एप्रिल रोजी प्रेमराज सारडा कॉलेजच्या बहुउद्देशीय हॉलमध्ये एक अनोखा सोहळा संपन्न झाला.माहेश्वरी समाजातील ७५व त्यापेक्षा जास्त वय असलेल्या ४० महिलांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला.मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा सुनंदा सोमाणी, वर्तमान अध्यक्षा स्नेहलता सोमाणी, प्रमुख अतिथी ललिताजी मालपाणी, कार्यक्रमाच्या अध्यक्षा जिल्हाध्यक्षा अनुराधाजी राठी,बसंती बाई काकानी यांच्या उपस्थितीत व प्रकल्प प्रमुख स्मिता सारडा, निर्मला बंग यांच्या हस्ते दीप प्रज्वलन होऊन कार्यक्रमास प्रारंभ झाला. कार्यक्रमांच्या प्रारंभी सर्व ज्येष्ठ महिलांचा फुलांची उधळण करत स्वागत करण्यात आलं. त्यानंतर च्या भरगच्च कार्यक्रमात महिलांनी वेलकम ड्रिंक, नाश्ता, चहा, भोजन यांचा आस्वाद घेतला. सुंदर भेटवस्तू देऊन त्यांचे आशिर्वाद घेतले गेले. गाण्यावर आधारित छान छान रिल्स बनवण्यात आल्या. या वयात ही सर्व महिला अत्यंत उत्साहाने कोरिओग्राफर ने दाखवल्याप्रमाणे हुबेहूब कृती आणि अभिनय करत होत्या. रील बनवत असताना महिलांचा आनंद खरोखरच बघण्यासारखा होता. किशोरी बिहाणी, प्रतिभा बजाज,पुष्पा अट्टल, समता दमाणी यांनी रील बनविण्यासाठी परिश्रम घेतले.

## 'आनंद चालीसा' पठणास उत्साहात प्रारंभ

**अहिल्यानगर** : सारसनगर परिसरातील औसरकर मळा येथे गुरु भक्तीची भावना वृद्धिंगत करण्यासाठी 'आनंद चालीसा' पठण या धार्मिक उपक्रमास उत्साहात प्रारंभ झाला आहे. प्रवर्तक गुरुदेव श्री कुंदनऋषि महाराज यांच्या प्रेरणेने प्रत्येक शनिवारी रात्री ९ वाजता हा उपक्रम नियमितपणे आयोजित करण्यात येणार आहे. शनिवार (ता. १८) रोजी महासतीजी श्री ज्ञानप्रभाजी 'सरल' महाराज यांच्या सान्निध्यात ओम कॉलनी, नानाजी नगर, सारसनगर येथील श्री अमृतलाल चोरडिया यांच्या निवासस्थानी 'आनंद चालीसा' पठण भावपूर्ण वातावरणात पार पडले. याप्रसंगी सुनील गांधी, रितेश पारख, सुरेश मनोत, हिरालाल गुंदेचा, दिपक कासवा, रोहित गांधी, पियुष भंडारी, नील गांधी, मोहित गांधी, सागर चोरडिया, आकाश चोरडिया, तुषार चोरडिया, दिपक गुगळे, प्रणय चोरडिया, प्रितेश लुंकड, अशोक छल्लाणी, कनकमल गांधी, किरण उकिर्डे, राजेंद्र नागपुरे आदी उपस्थित होते.

## ६ एप्रिल रोजी 'जनलोक एनजीआय क्रांती सत्याग्रह'

**अहिल्यानगर** : भारतीय समाजातील जातिव्यवस्थेचा अंत केवळ कायदे किंवा भाषणांद्वारे होणार नाही, तर मानवी मेंदूमधील 'नॉन-जेनेटिक इन्फॉर्मेशन' बदलल्यानेच शक्य आहे, असा ठाम दावा करत पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने दि. २६ एप्रिल रोजी अहिल्यानगर येथे 'जनलोक एनजीआय क्रांती सत्याग्रह' आयोजित करण्यात आला आहे. या माध्यमातून जात, अंधश्रद्धा व मतदास्य निर्मूलनासाठी राष्ट्रव्यापी वैचारिक उठाव उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. या सत्याग्रहामागे ऐतिहासिक विचारांना विज्ञानाची जोड देणारा ठोस पाया असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# श्रीगोंद्यात लहरी उन्हाळा, तापमानाचा विक्रम; पाण्याची भीषण टंचाई,जबाबदारी नेमकी कुणाची?

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा** : उन्हाचा वाढता तडाखा, अंगाची लाही लाही आणि तापमानाचे विक्रम हे आपल्या देशासाठी काही नवे नाही. भारत उष्ण कटिबंधात असल्याने कडक उन्हाळा हा आपल्या जीवनाचा भागच आहे. दरवर्षी उष्माघाताने काही बळी जातात, आणि आपण त्याला नैसर्गिक म्हणून पुढे सरकतो. पण यंदा प्रश्न उष्णतेचा नाही, तर तिच्या लहरीपणाचा आहे.

गेल्या काही वर्षांत आपण पावसाचा लहरीपणा अनुभवला अवकाळी पाऊस, गारपीट, शेतीचे नुकसान. दोन वर्षांपूर्वी तर उन्हाळ्याच्या तोंडावर महाराष्ट्रात व्यापक गारपीट झाली. ही केवळ अपवादात्मक घटना नव्हती; राज्याच्या अनेक भागांनी हा धक्का अनुभवला. तीन शतकांत नोंद न झालेला हा प्रकार होता. आता त्याच लहरीपणाने उन्हाळ्याला कवेत घेतले आहे.जागतिक तापमानवाढीच्या चर्चांमध्ये पृथ्वीचे सरासरी तापमान अर्धा ते एक अंशाने वाढल्याचे सांगितले जाते. हे आकडे कागदावर छोटे दिसतात, पण प्रत्यक्षात त्याचे परिणाम भीषण आहेत. महाराष्ट्रातील नांदेड, परभणी, नागपूर, चंद्रपूरसारखे जिल्हे आधीच उष्णतेसाठी ओळखले जातात. चंद्रपूरमध्ये ४७-४८ अंश तापमान नवे नाही. पण यंदा हा तडाखा अधिक लांबला, अधिक अनियमित झाला आणि तेच खरे चिंतेचे कारण आहे. पावसाच्या लहरीपणामुळे तलाव आटले, पाण्याची टंचाई तीव्र झाली. त्यात वाढत्या तापमानाने उरलेले पाणीही संपवले. ही केवळ निसर्गाची करामत नाही; ही आपल्या नियोजनातील उणीवांची पावती आहे.खरं सांगायचं तर, पाण्याचा प्रश्न हा फक्त सरकारचा नाही तो समाजाचा आहे. आपण अजूनही सरकार करेल या मानसिकतेत अडकून आहोत. जलसंधारण, पाणी अडवा-पाणी जिरवा, स्थानिक पातळीवरील उपायहे शब्द भाषणातच राहिले. कृती मात्र अजूनही अपुरीच आहे .दरवर्षीप्रमाणे यंदाही एप्रिलच्या अखेरीस आणि मेच्या पूर्वार्धात कडक उन्हाळा राहील.असे सांगितले जात असताना मेच्या मध्यावर तापमान कमी होईल, वळवाचा पाऊस येईल अशी अपेक्षा होती. अंदमानात मोसमी पावसाचे आगमन लवकर होईल, अशा बातम्यांनी आशा पल्लवित केली होती. पावसाऐवजी तापमान वाढले, दिलास्याऐवजी त्रास वाढलाआणि त्यातच नव्या विक्रमांची भर पडली.या वाढलेल्या उन्हाळ्यात उष्माघाताचे बळीही वाढू लागले. पण एक कटू सत्य लक्षात घ्यावे लागेल हे बळी केवळ उष्णतेचे नसतात, ते गरिबीचे बळी असतात.कारण ज्यांच्याकडे घर नाही, सावली नाही, पर्याय नाही तेच या उन्हात होरपळतात. सुस्थितीतला माणूस एसीत बसतो; गरीब मात्र उन्हातच जगतो आणि कधी कधी मरतोही.मात्र त्याची लवकर दखल घेतली तर जीव वाचेल अशी काळजी कोणीही घेण्यास कोणीही तयार नाही थंडी असो किंवा उन्हाळा आपल्या देशात जीव घेतो तो ऋतू नाही, तर परिस्थिती आहे असे खुलेआम बोलले जात आहे आज गरज आहे ती दोषारोपांची नाही, तर सामूहिक कृतीची.आहे नाहीतर प्रत्येक वर्षी उन्हाळा येईल वातावरण तापेलअन लोक मरत राहतील त्यावर सरकारकडून दाखल कधी घेतली जाणार याकडे सर्वांचे लक्ष लगावून राहिले आहे

## श्रीगोंदा तहसील कार्यालयावर कर्मचाऱ्यांचा एलगार

**लिंपणगाव** : महाराष्ट्र राज्य सरकारी व निमसरकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी समन्वय समितीने २१ एप्रिल पासून पुकारलेल्या बेमुदत संपामध्ये श्रीगोंद्यातील कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

विधानसभेच्या पटलावर मान्य झालेल्या मागण्यांचा शासनाला विसर पडल्याने व प्रलंबित मागण्यांचे घोंगडे कायमच भिजत ठेवल्यामुळे कर्मचारी बेजार होऊन सरकार कर्मचाऱ्याबाबत दुजाभाव का करत आहे? हा प्रश्न सर्व कर्मचाऱ्यांना पडला आहे. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्या मान्य करून घेण्यासाठी बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे.

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त सर्वच कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, चतुर्थ श्रेणी वरील भरती बंदी तत्काळ उठवणे,१०:२०:३० वर्षाच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनाचा लाभ तत्काळ लागू करणे, कॅशलेस मेडिक्लेम योजना लागू करणे, सेवानिवृत्तीचे वय ६० वर्ष करणे, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्ती तत्काळ देणे, अशा विविध मागण्यासाठी तहसील कार्यालयासमोर कर्मचाऱ्यांच्या वतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनामध्ये एम एस लगड, बापूसाहेब गायकवाड, देवराम दरेकर, देविदास खेडकर, डीपी पुराने, बंटी सुपेकर, रामदास जंजिरे, उत्तमराव भुजबळ, शरद पवार, शिवाजी नागवडे इथापे सर तसेच महादजी शिंदे विद्यालय व कन्या विद्यालय श्रीगोंदा चे सर्व कर्मचारी, तालुक्यातील इतर सर्व शाखांचे कर्मचारी, तसेच तालुका समन्वय समितीतील सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी मुख्याध्यापक संघाच्या वतीने माध्यमिक शिक्षक सोसायटीचे मा. चेअरमन दिलीपराव काटे हे उपस्थित होते.

## दहावीच्या सीबीएसई परीक्षेत ९९.२० टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम आल्याबद्दल स्नेहांशु दोमल याचा सत्कार



**अहिल्यानगर** : शहरातील विठ्ठलवाडी-वाघमळा येथील रहिवाशी स्नेहांशु संतोष दोमल यांनी दहावीच्या CBSE दिल्ली बोर्ड परीक्षेत ९९.२०% गुण मिळवून चैतन्य टेक्नो स्कूलमध्ये पहिला नंबर मिळवून उत्तुंग यश संपादन केले. या निमित्ताने भैरवनाथ मंडळाच्या वतीने स्नेहांशु दोमल याचा सत्कार करताना श्री.कचरुभाऊ पाडळे,महेश ढाणके, दत्तात्रय भगत, विलास पाडळे, शंकर नागूल, बाबासाहेब ससे, शेखर नागूल, अनिस पाडळे, जयेश श्रीगादी, पंकज ससे, ऋषिकेश ससे, अभिषेक दौंडकर, मनोज पाडळे, विशाल नागूल, चेतन नागूल, बाळासाहेब नागूल तसेच परिसरातील महिला वर्गाचीही मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी परिसरातील सर्वांनी स्नेहांशु दोमलला पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.

## अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तातडीने जाहीर करा

**अहिल्यानगर** : सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य सरकारने अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण तातडीने जाहीर करावे, अशी मागणी भारतीय लहुजी सेना व शाहू-फुले-आंबेडकर-साठे कलाम विचारमंचच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेच्या शिष्टमंडळाने निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांची भेट घेऊन निवेदन दिले.

## शेतजमिनीच्या वाटणीपत्रावरील नोंदणी शुल्क माफ; शासनाकडून स्पष्टता

**लिंपणगाव** : राज्य सरकारने शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर आकारले जाणारे नोंदणी शुल्क पूर्णपणे रद्द करत याबाबत स्पष्ट निर्देश जारी केले आहेत. मंत्रिमंडळाच्या दिनांक २५ मे २०२५ रोजी झालेल्या बैठकीत या निर्णयास मान्यता देण्यात आली होती. त्यानंतर २३ जून २०२५ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. या अधिसूचनेनुसार, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम ८५ अंतर्गत सहधारक किंवा एकाच कुटुंबातील सदस्यांनी केलेल्या शेतजमिनीच्या वाटणीपत्रावर नोंदणी शुल्क आकारले जाणार नाही, अशी तरतूद करण्यात आली होती. मात्र, काही प्रकरणांमध्ये सहधारकांकडून कलम ८५ अंतर्गत प्रक्रिया न करता आपसी सहमतीने तयार केलेले वाटणीपत्र थेट दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीसाठी सादर केले जात होते. अशा दस्तांवर अधिसूचनेत स्पष्ट तरतूद नसल्यामुळे नोंदणी शुल्क आकारले जात असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर शासनाने स्पष्ट केले आहे की, वडिलोपार्जित शेतजमिनीबाबत सर्व सहधारकांनी आपसी सहमतीने तयार केलेले आणि थेट नोंदणीस सादर केलेले वाटणीपत्र, जरी कलम ८५ अंतर्गत प्रक्रिया नसली तरी, त्यांनाही नोंदणी शुल्कातून पूर्ण माफी देण्यात येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आणि माननीय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकारातून घेतलेल्या या निर्णयामुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## भोसेखिंडीसाठी कुकडी प्रकल्पातून कायमस्वरूपी आवर्तन मिळावे : काकासाहेब तापकीर यांची मागणी

**कर्जत** : कुकडी प्रकल्पातून कर्जत तालुक्यातील भोसेखिंड प्रकल्पासाठी कायमस्वरूपी आवर्तन उपलब्ध करावे अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर यांनी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडे केली.

सध्या उन्हाळयाचे दिवस असून वाढत्या उन्हाच्या तापमानामुळे नैसर्गिक पाण्याचे जलस्रोताची पाण्याची पातळी खालावली जात आहे. उन्हाळ्याचे तब्बल दीड महिना बाकी असून अनेक गावांत पाणीटंचाई उदभवण्याची दाट शक्यता आहे. सर्वसामान्य शेतकरी आणि नागरिकांना आगामी काळात पाण्यासाठी वणवण करावी लागेल. या अनुषंगाने भोसेखिंड प्रकल्पास कायमस्वरूपी कुकडी प्रकल्पातून आवर्तन उपलब्ध केल्यास भोसाखिंड प्रकल्प लाभक्षेत्रातील गावांचा कायमस्वरूपी प्रश्न मार्गी लागणार आहे. खांडवी, कोंभळी, निमगाव गांगर्डा येथील सीना धरण लाभक्षेत्र परिसरातील इतर गावे अवलंबून आहेत. आजमितीस कुकडी प्रकल्पातील अतिरिक्त झालेले पाणीच या भागाला मिळते. वास्तविक पाहता ते देखील शेतीसाठी आणि पिण्यासाठी पाणी उपलब्ध होत असले तरी ते पुरेश्या प्रमाणात मिळत नाही.

त्यामुळे वरील भागातील सर्वसामान्य शेतकरी, नागरिक आणि खासकरून महिला भगिनींकडून कुकडी प्रकल्पातून भोसाखिंडीसाठी हक्काचे कायमस्वरूपी आवर्तन मिळावे अशी मागणी पुढे येत आहे. त्या अनुषंगाने कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर यांनी वरील मागणीचे निवेदन विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्याकडे सकारात्मक दृष्टीकोनातून निर्णय घ्यावा अशी विनंती केली आहे.

## समृद्ध पंचायत राज अभियानासाठी शेवगावात २० ग्रामपंचायतींची अंतिम तपासणीपूर्व पाहणी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव** : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत अंतिम मूल्यांकनाच्या पार्श्वभूमीवर शेवगाव तालुक्यातील २० ग्रामपंचायतींना मार्गदर्शक भेटी देण्यात आल्या. या पाहणीद्वारे ग्रामपंचायतींची पूर्वतयारी तपासून आवश्यक सुधारणा सुचविण्यात आल्या.

गट विकास अधिकारी सोनल शहा यांच्या मार्गदर्शनाखाली विस्तार अधिकारी महादेव भोसले, सुजित भोंग व दादासाहेब शेळके यांनी सलग चार दिवस तालुक्यातील सर्व २० ग्रामपंचायतींचा दौरा करत दप्तरांची सखोल तपासणी केली. या वेळी ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच, सदस्य तसेच ग्रामस्थांशी संवाद साधून विविध बाबींमध्ये सुधारणा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

अभियानाचा मुख्य उद्देश गावांचा सर्वांगीण विकास साधणे हा असून, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी, पशुवैद्यकीय दवाखाने, प्राथमिक आरोग्य केंद्र, घरकुल योजना, रस्ते, पिण्याचे पाणी, बचत गट व स्वच्छता यांसारख्या मूलभूत सुविधांवर विशेष भर दिला जात आहे.

दरम्यान, २६ एप्रिलपासून केज तालुक्यातील गट विकास अधिकाऱ्यांची समिती शेवगाव तालुक्यात दाखल होऊन संबंधित ग्रामपंचायतींचे अंतिम मूल्यांकन करणार आहे. या मूल्यांकनात मिळणाऱ्या गुणांच्या आधारे पंचायत समितीचा एकूण दर्जा निश्चित होणार असल्याने, शेवगाव पंचायत समितीचा परफॉर्मन्स उत्कृष्ट राहावा व ग्रामपंचायतींना जिल्हा, विभागीय तसेच राज्यस्तरावर बक्षिसे मिळावीत, या उद्देशाने ही पूर्वतयारी करण्यात आली असल्याचे गटविकास अधिकारी सोनल शहा यांनी सांगितले.

## दूरसंचार सल्लागार समितीवर नियुक्तीचा गौरव

### आढळगावात अनिल ठवाळ यांचा भव्य सत्कार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**श्रीगोंदा** : आढळगावचे सरपंच तथा माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल ठवाळ यांची भारत सरकारच्या दूरसंचार सल्लागार समितीवर नियुक्ती झाल्याबद्दल ग्रामस्थ, दिव्यांग बांधव व पत्रकार बांधव यांच्या वतीने भव्य सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ग्रामपंचायत सदस्य बबनराव काळे होते. यावेळी लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकार बांधवांसह दिव्यांग बांधव व उद्योग-व्यवसाय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या उद्योजकांचाही अनुराधा उद्योग समूहाच्या वतीने सन्मान करण्यात आला.

अनिल ठवाळ यांनी सरपंच ते जिल्हा परिषद सदस्य असा प्रवास करताना गेल्या ३०-३५ वर्षांत आढळगाव, श्रीगोंदा व अहमदनगर परिसरात जनतेच्या प्रश्नांना केंद्रस्थानी ठेवून काम केले. पाणी, वीज, रस्ते अशा मूलभूत सुविधांसाठी त्यांनी वेळोवेळी आंदोलन, रस्ता रोको, उपोषण यांसारख्या मार्गाने प्रशासनाला धारेवर धरत जनतेला न्याय मिळवून दिला.

कुकडी प्रकल्पातील डी.वाय. १२, १३, १४ तसेच देव नदीला पाणी उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आलेल्या योजनेमुळे परिसराच्या विकासाला चालना मिळाली. गावातील रस्ते, बंधारे, स्ट्रीट लाईट यांसारखी अनेक विकासकामे त्यांच्या पुढाकारातून साकारली गेली.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत खासदार निलेश लंके यांच्या प्रचाराची धुरा सांभाळत त्यांनी श्रीगोंदा तालुक्यात लक्षणीय मताधिक्य मिळवून दिले. त्यांच्या या कार्याची दखल घेत ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या शिफारशीने व केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या स्वाक्षरीने त्यांची दूरसंचार सल्लागार समितीवर नियुक्ती करण्यात आली.यावेळी सरपंच शिवप्रसाद उबाळे म्हणाले, राजकीय मतभेद बाजूला ठेवून समाजहितासाठी एकत्र येणे, हीच आमची ताकद आहे. ठवाळ यांची नियुक्ती ही त्यांच्या दीर्घकालीन जनसेवेची पावती आहे.डॉ. राजेंद्र डाळिंबे यांनी ठवाळ यांना छत्रपती शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चालणारा नेता म्हणून गौरविले. माजी उपसरपंच अंबादास चव्हाण यांनीही त्यांच्या धाडसी नेतृत्वाचा उल्लेख केला.या प्रसंगी पिनूदादा भैलुमे, तसेच ग्रामस्थ, पत्रकार बांधव व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भोंदूगिरींविरोधात राज्यव्यापी मोहीम राबवा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर** : महाराष्ट्रात अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि त्यातून होणाऱ्या महिला व अल्पवयीन मुलींच्या शोषणाच्या घटना वाढत असून, अशा सर्व प्रकारांवर शासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष सौ. स्वाती सिरसुल यांनी केली आहे.

गेल्या महिन्याभरात राज्यभर गाजलेल्या भोंदू कॅप्टन अशोक खरात प्रकरणामुळे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. विशेषतः महिलांवरील लैंगिक शोषण, अत्याचार आणि फसवणुकीच्या घटनांमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या प्रकरणातून जनतेला वास्तव समजले असले, तरी अशाच प्रकारे काळी जादू, चमत्कार, भविष्यवाणी, अंकज्योतिष किंवा 'देवाचे अवतार' असल्याचा दावा करून लोकांची फसवणूक करणारे अनेक भोंदूबाबा आजही सक्रिय असल्याचा आरोप सिरसुल यांनी केला.

त्यांनी पुढे म्हटले की, काही भोंदूंचे राजकीय नेते, मंत्री, वरिष्ठ अधिकारी तसेच समाजातील प्रभावशाली व्यक्तींशी संबंध असल्यामुळे त्यांचा दबदबा वाढला. त्यामुळे त्यांच्या विरोधातील लैंगिक शोषण, अत्याचार, विनयभंग आणि आर्थिक घोटाळ्यांची माहिती असूनही पीडितांनी तक्रार करण्यास धजावले नाही. राजकीय पाठबळामुळे न्याय मिळणार नाही, या भीतीमुळे अनेक महिला पुढे आल्या नाहीत, हे वास्तव आता उघड झाले आहे. काही उच्चपदस्थ अधिकारी व नेत्यांचे अशा व्यक्तींसोबतचे फोटो समोर आल्याने सामान्य जनतेतही संताप व्यक्त होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

धर्मांतर, ड्रग्स प्रकरणे, अश्लील व्हिडिओद्वारे ब्लॅकमेलिंग आणि महिलांवरील वाढते अत्याचार या गंभीर बाबींवर नियंत्रणासाठी कडक कायदे करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे, असेही सिरसुल यांनी सांगितले. नाशिकमधील प्रकरण, मुंबईतील गोरेगाव ड्रग्स प्रकरणातील तरुणांचे मृत्यू, अमरावतीतील परतवाडा येथील महिलांचे शोषण, तसेच संगमनेर तालुक्यातील वडगाव पान येथील भोंदूगिरीचे प्रकार यामुळे राज्यभर चिंता वाढली आहे. या सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर तपास यंत्रणांची भूमिका काय, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

याच अनुषंगाने, आजच्या डिजिटल युगात नाशिकसारख्या धार्मिक व पवित्र क्षेत्रात असलेल्या आयटी पार्कमध्येही महिलांची सुरक्षितता धोक्यात असल्याचे समोर आले आहे. टीसीएस कंपनीच्या आयटी क्षेत्रात कार्यरत असलेल्या सॉफ्टवेअर व आयटी इंजिनिअर सारख्या उच्चशिक्षित महिलांचे धर्मांतर करून त्यांचे वारंवार लैंगिक शोषण झाल्याच्या घटना समोर आल्या असून, कॉर्पोरेट क्षेत्रातही महिला सुरक्षित नाहीत.

## सरकारी, निमसरकारी कर्मचारी आणि शिक्षक-शिक्षकेतर संपावर



**अहिल्यानगर** : राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवार (दि. २१ एप्रिल) पासून बेमुदत संपावर गेले आहेत. अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत शासनाच्या कामगार विरोधी धोरणाचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला.

प्रलंबित १८ मागण्यांसाठी हा निर्णायक लढा असून, शासनाने तात्काळ निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही आंदोलनकर्त्यांनी दिला. विविध घोषणाबाजी करत कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांसाठी जोरदार निदर्शने केली. या आंदोलनात समन्वय समितीचे निमंत्रक रावसाहेब निमसे, सरकारी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, विलास पेद्राम, वंदना नेटके, विजय काकडे, भागवत नवगण, अशोक मासाळ, भगवान सानप, सुषमा उमाप, सौ. सुतार, श्रीमती ज्योती दांगट, राहुल कोळेकर, नाड भाऊसाहेब आदींसह सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

संघटनांच्या मते, पूर्वीच्या शासनकाळात दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण करण्यात आलेली नाहीत. आर्थिक व सेवाविषयक प्रश्नांवर सातत्याने चालढकल केली जात असल्याने कर्मचारी वर्गात तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. शासनाचे लक्ष वेधूनही मागण्या पूर्ण होत नसल्यामुळे अखेर बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे संघटनांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

बुधवार, दि.२२ एप्रिल २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## बस प्रवासात ४० हजारांची रोकड लंपास; अज्ञाताविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई पोलीस स्टेशन हद्दीत बस प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्याने ४० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी संजय गाडेकर (वय ४३, रा. घोडेगाव, ता. नेवासा) हे १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.३० ते ११.४५ वाजण्याच्या दरम्यान बसने प्रवास करत होते. यावेळी त्यांच्या जवळ असलेल्या पिशवीत ठेवलेली ४० हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्याने संधी साधून चोरून नेली. या रकमेतील ५०० रुपयांच्या ८० नोटांचा समावेश असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

प्रवासादरम्यान गर्दीचा फायदा घेत चोरट्याने ही चोरी केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेनंतर फिर्यादी यांनी नातेवाईकांशी चर्चा करून २१ एप्रिल २०२६ रोजी रात्री सोनई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार भादंवि कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधिकारी करत असून, अज्ञात चोरट्याचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# गावठी कट्ट्यासह दोन तरुण ताब्यात !

## गावठी कट्टा, काडतुस, असा ५.५२ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील उंबरे शिवारात अहिल्यानगरच्या स्थानिक गुन्हे शाखेकडुन गावठी कट्टा बाळगणारे ०२ इसम ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून १ गावठी कट्टा, २ काडतुस, असा एकुण ५,५२,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या घटने संदर्भात मिळालेली माहिती अशी की, अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेस अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध अग्निशस्त्रे बाळगणारे इसमांची माहिती काढुन त्यांच्यावर कारवाई करण्यासंबंधी आदेश दिले होते.




त्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी, पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेतील पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, विशाल तनपुरे, भगवान थोरात, रमिझराजा आतार, अरुण मोरे, महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत यांचे पथक तयार करुन सदर पथकास अहिल्यानगर जिल्ह्यातील अवैध अग्निशस्त्रे बाळगणाऱ्या इसमांची माहिती घेऊन त्यांच्या विरोधात कारवाई करण्याचे आदेश पोलीस पथकाला दिले होते. या अनुषंगाने सोमवार दिनांक २०/०४/२०२६ रोजी वरील पथक हे राहुरी तालुक्यामध्ये अवैध अग्निशस्त्रांची माहिती काढत असतांना या पथकास दोन इसम विशाल पालवे व सोमनाथ मोरे दोन्ही रा. नेवासा हे गोटुंबे आखाडा, ते शनिशिंगणापुर कडे जाणाऱ्या रोडवर पांढऱ्या रंगाचे गाडीमध्ये विनापरवाना गावठी कट्टा आपल्याजवळ बाळगुन फिरत असल्याची माहिती मिळाली.

त्यानुसार पोलीस पथकाने त्या वाहनाचा व त्या इसमांचा शोध घेत असतांना सदरचे वाहन हे उंबरे ता. राहुरी, येथील हॉटेल माऊली परिसरामध्ये संशयास्पद रित्या थांबले असल्याचे आढळून आले. पोलीस पथकाने वाहनाची तपासणी केली असता वाहनामध्ये दोन इसम संशयित रित्या बसलेले दिसुन आले. पथकाने सदर इसमांना ताब्यात घेतले. विशाल वसंत पालवे वय २८ वर्षे, रा. झापवाडी रोड, घोडेगांव, ता. नेवासा, सोमनाथ भानुदास मोरे वय ३२ वर्षे, रा. शनिशिंगणापुर, ता. नेवासा जि. अहिल्यानगर अशी त्यांची नावे आहेत.

पोलीस पथकाने या इसमांना ताब्यात घेऊन पंचासमक्ष त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे ३०,००० रुपये किमतीचा एक गावठी कट्टा (अग्निशस्त्र), २००० रुपये किमतीचे ०१ जिवंत काडतुस, ०१ मिस फायर झालेले काडतुस, २०,००० रुपये किमतीचे दोन ण्ड्राईड मोबाईल फोन, ५,००,००० रुपये किमतीची एक सुझुकी कंपनीची दङ६ कार असा एकुण ५,५२,००० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

त्या आरोपीविरुध्द पो.कॉ. भगवान बाळासाहेब थोरात स्थानिक गुन्हे शाखा, अहिल्यानगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राहुरी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३९७/२०२६ भारतीय हत्यार कायदा कलम ३/२५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास राहुरीचे पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली राहुरी पोलीस करीत आहे. सदरची कारवाई सोमनाथ घार्गे पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केलेली आहे.

## तरुणांना मदत करताना कोयत्याने हल्ला; दोघे जखमी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरातील थत्ते ग्राउंड परिसरात मोटारसायकलवरून पडलेल्या दोन तरुणांना मदत करण्यासाठी गेलेल्या युवकावरच कोयत्याने हल्ला झाल्याची धक्कादायक घटना रविवारी रात्री घडली. या घटनेत दोन जण जखमी झाले असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री सुमारे १० वाजता दोन तरुण स्प्लेंडर मोटारसायकलवरून जात असताना त्यांचा तोल जाऊन ते रस्त्यावर पडले. यावेळी परिसरातील नागरिक मदतीसाठी धावले. बेलापूर येथील नासीर सय्यद यांनी त्यांना उचलण्याचा प्रयत्न केला असता, त्यापैकी एकाने सय्यद यांच्यावर कोयत्याने वार केला. या हल्ल्यात सय्यद जखमी झाले. घटनेनंतर संबंधित तरुण तेथून पसार झाले. मात्र काही वेळातच पुन्हा त्याच परिसरात येत त्यांनी पूर्णवादनगर येथील विशाल पवार यांच्या डोक्यात कोयत्याने वार करून त्यांनाही जखमी केले. जखमी पवार यांना तातडीने साखर कामगार रुग्णालयात दाखल करण्यात आले. या घटनेमुळे थत्ते ग्राउंड परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. रात्रीच्या वेळी येथे फेरफटका मारण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक येत असल्याने भीतीचे वातावरण पसरले आहे. दरम्यान, या प्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात उशिरापर्यंत गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू होती. हल्लेखोर हे १८ ते १९ वयोगटातील तरुण असल्याची प्राथमिक माहिती असून शहरात पुन्हा 'कोयता गँग' सक्रिय झाली का, अशी चर्चा रंगली आहे.

### सीसीटीव्हीच्या आधारे तपास

या घटनेतील आरोपींचा शोध घेण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून लवकरच त्यांना अटक करण्यात येईल, अशी माहिती उपविभागीय पोलिस अधिकारी जयदत्त भवर यांनी दिली.

## शेतात घुसून कांदा व मोटार चोरी

### पिकाचेही नुकसान : सहा जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई परिसरात शेतात अनाधिकृत प्रवेश करून कांदा पिक व पाण्याची मोटार चोरी केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी सोनई पोलिस ठाण्यात सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी नंदकिशोर कचरुदास बंग (वय ६६, व्यवसाय शेती) यांच्या गट क्रमांक १३२/१ येथील शेतात दि. १९ एप्रिल रोजी दुपारी ३.०० ते ६.०० या वेळेत आरोपींनी प्रवेश केला. आरोपींमध्ये सोमनाथ एकनाथ लष्करे, राहुल सोमनाथ कुसळकर अजय केशव लष्करे, रमेश शेटीबा कुसळकर विकास विठ्ठल कुसळकर यांचा समावेश असून त्यांच्यासोबत एक अनोळखी पुरुष व एक महिला असल्याचे नमूद करण्यात आले आहे. आरोपींनी फिर्यादीच्या शेतातील सुमारे १२ हजार रुपये किमतीचा कांदा व पाण्याची मोटार जबरदस्तीने नेल्याचा आरोप आहे. तसेच शेतातील कांदा पिकामध्ये ट्रॅक्टरच्या सहाय्याने रोटावेटर फिरवून मोठे नुकसान केल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

याप्रकरणी अधिक तपास सोनई पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार बाचकर हे अधिक तपास करत आहेत.

# तुम्ही बेरर चेक द्या ! चार तारखेला तो चेक मी वटवितो : रावसाहेब खेवरे

राजेंद्र परदेशी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराच्या शेवटच्या दिवशी रणधुमाळी सुरू होती. व प्रचार तोफा थंडावणार असल्याने काल अपक्ष उमेदवार व शिवसेना ठाकरे गटाचे कट्टर समर्थक असलेले रावसाहेब खेवरे यांनी प्रचारात चांगलीच मुसंडी घेतली आहे. प्रचाराच्या शेवटच्या दिवशी त्यांनी राहुरी शहरातून मोठी रॅली काढत आपले शक्ती प्रदर्शन केले. या रॅलीसाठी महिला भगिनी व नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता या सभेसाठी हजारोंचा समुदाय उपस्थित होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहुरी येथील प्रतिष्ठित व्यापारी ओंकार दरक हे होते. यावेळी व्यासपीठावर डॉ संजय म्हसे, प्रशांत शिंदे, बाळासाहेब गाडे, मच्छिंद्र धुमाळ, दिपाली ढोकणे,स्वाती परदेशी, अमोल बुऱ्हाडे, अशोक सातपुते, दिपक पंडित आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी सभेत बोलताना रावसाहेब खेवरे म्हणाले की,राहुरी नगर पाथर्डी या विधानसभेच्या पोटनिवडणुकीच्या निमित्ताने आज आपण सांगता सभा या ठिकाणी घेत आहोत या सभेचे अध्यक्ष माझे मित्र ओंकार शेट यांना मी म्हणालो होतो की, ही निवडणूक मला लढवायची नव्हती. त्यामागील कारण असे की, २०२४ ला प्राजक्त दादा तनपुरेंनी महाविकास आघाडीतून निवडणूक लढविली होती. त्यामुळे या उमेदवार पदाचे ते प्रमुख दावेदार होते. मी उद्धवजी ठाकरेंना भेटलो होतो. पहिल्यांदा मी त्यांना भेटलो




होतो तेव्हा ते म्हणाले की, ही जागा राष्ट्रवादीची आहे.व आपला आघाडीचा धर्म आहे. तेव्हा मी माझा निर्णय मागे घेतला परंतु मला जेव्हा समजले की प्राजक्त दादा निवडणूक लढविणार नाही. त्यामुळे मी अर्ज भरण्यासाठी चार दिवस राहिलेले असताना पुन्हा गेलो आणि पुन्हा उद्धव ठाकरेंना सांगितलं की ते निवडणुकीला उभे राहण्याच्या तयारीत नाही. तेव्हा मला तिकीट द्या.

मी निवडणूक लढतो त्यावेळी त्यांनी माझ्यासमोर शरद पवार साहेबांना फोन केला आणि विचारलं की माझा जिल्हाप्रमुख उमेदवारी मागतोय तुम्ही ही निवडणूक लढणार आहात का ? असे विचारले असता त्यांनी स्पष्ट भाषेत सांगितलं की होय आम्ही पूर्ण ताकतीने ही निवडणूक लढणार आहे एवढे मोठे दोन माणसे एकदा बोलले की आपल्यासारख्या छोट्या माणसांनी मध्ये बोलायचं नसतं मग मी निघून आलो निघून आल्यावर मला समजले की प्राजक्त दादांनी निवडणुकीतून माघार घेतली आहे. त्यामुळे मी निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. ज्यावेळी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले त्यावेळी त्यांचा मला फोन आला व ते म्हणाले की, तुम्हाला नगर जिल्हा सांभाळावयाचा आहे तेव्हा मी त्यांना स्पष्ट शब्दात सांगितले की मी उद्धव ठाकरे साहेबांचा व स्वर्गीय शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा कट्टर शिवसैनिक आहे.

मरेपर्यंत मी उद्धव ठाकरे साहेबांबरोबरच राहणार असल्याचे एकनाथ शिंदे यांना स्पष्ट भाषेत सांगितले. राहुरी तालुक्यासाठी मी कुणी नेता नाही मी एक शिवसैनिक आहे. व तालुक्याच्या अस्मितेसाठी मी विधानसभा लढवीत आहे. मी सुमारे ३२ वर्षापासून शिवसेनेचे काम करतो. व त्या माध्यमातून राहुरी तालुक्यात अनेक प्रकल्प राबविली आहेत. गोरगरिबांसाठी मी अहोरात्र झटत आहे म्हणूनच एवढी जनता आज माझ्या मागे असून माझ्या सभेत हजारोच्या संख्येने उपस्थिती दाखवली हीच माझ्या कामाची पावती आहे. त्यामुळे आपल्या गावातील उमेदवार म्हणून मला विधानसभेत काम करण्याची संधी द्या. एकेकाळी राहुरी तालुक्यातून महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ ठरवलं जात होतं. या सगळ्या गोष्टी या राहुरी सारख्या ठिकाणी ठरतात त्यामुळे मला राष्ट्रवादी काँग्रेस उमेदवारी देत होते. मी फक्त शिवसेनेचा पदाधिकारी असूनही निळवंडे प्रकल्पाबाबत ठोस भूमिका घेऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणात शिवसैनिकांचा वाटा आहे. हे केवळ तुमच्या सहकार्यामुळे साध्य होत आहे. त्यामुळे आपल्या गावातील एका शेतकऱ्याच्या मुलाला सहकार्य करा व येत्या चार तारखेला मला मोठ्या प्रमाणात मतदान करून विधानसभेत पाठविण्यासाठी संधी द्या. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अक्षय कर्डिले यांना राज्याच्या तिजोरीतून बेरर चेक देऊन जातो या वक्तव्यावर रावसाहेब खेवरे म्हणाले की तुम्ही बेरर चेक द्या व चार तारखेला तो मी वटविणार असे खात्रीलायक उद्गार त्यांनी काढले. याप्रसंगी हजारोच्या संख्येने सभेला नागरिक उपस्थित होते.

## शाळा स्वयं मूल्यांकन प्रक्रियेत अहिल्यानगर जिल्ह्यात फक्त ६०.५ % नोंद

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**बेलापूर** : शाळा गुणवत्ता स्वयं मूल्यांकन प्रक्रियेपासून राज्यात ५८ हजाराहून अधिक शाळा अद्यापही दूर आहेत. राज्यात सातारा जिल्ह्यातील सर्वाधिक ८१.६६ % शाळांनी मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण केली असून अहिल्यानगर जिल्ह्यात ती फक्त ६०.५ % इतकी नोंदली गेली आहे. राज्यातील सर्व शाळांच्या गुणवत्ता वाढीसाठी राबविण्यात येत असलेल्या शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्याच्या अंतर्गत राज्यभरात शाळांचे स्वयं मूल्यमापन सुरू करण्यात आले आहे मात्र १५ एप्रिल पर्यंत दिलेल्या मुदतीमध्ये राज्यातील १ लाख ८ हजार ९२ शाळांपैकी फक्त ४९ हजार ८४४ शाळांनीच स्वयंमूल्यकन प्रक्रिया पूर्ण केली आहे त्यामुळे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून या प्रक्रियेसाठी एक मेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे राज्यातील शाळांचे एकसमान व प्रभावी मूल्यांकन करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत राज्यशाळा मानक प्राधिकरण कक्ष स्थापन करण्यात आला आहे या प्राधिकरणामार्फत सर्व माध्यमांच्या शाळांसाठी एसक्यूएएएफ हा आराखडा विकसित करण्यात आला आहे. २०२४- २५ मध्ये सोय मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर २०२५ - २६ साठी शाळांना स्वयं मूल्यांकनाच्या सूचना देण्यात आल्या होत्या त्यानुसार १६ मार्च ते १५ एप्रिल या कालावधीत इन या संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करून दिली होती या कालावधीत फक्त ४९ हजार ८४४ शाळांनी ही प्रक्रिया पूर्ण केली तर ५८ हजार २४८ शाळा त्यापासून अद्यापही दूर आहेत.

## भामाठाण येथे दोन गटात हाणामाऱ्या

### तालुका पोलीस ठाण्यात परस्परविरुद्ध गुन्हे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : कपडे कोणी घेतले या कारणावरून श्रीरामपूर तालुक्यातील भामाठाण येथे एकाच्या डोक्यात लोखंडी रॉड मारून त्याला जखमी करण्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. याबाबत पहिली फिर्याद संदीप मोरे, धंदा-ड्रायव्हर, रा. भामाठाण यांनी दिली असून त्यात म्हटले आहे की, संदीप मोरे यांचा पुतण्या रोहीत मोरे, बादल मोरे व संदीप पवार यांच्यात कपडे कोणी घेतले ? या कारणावरून हाणामारी झाली.

त्यानंतर रात्री १० ला संदीप पवार, जालू पवार व त्यांचे नातेवाईक घरासमोर आले व पुतण्याला शिवीगाळ करू लागले. जालू पवार याने त्याच्या जावयाला टिळकनगरला फोन करून पोरांना बोलावले. तेव्हा १०-१५ लोक संदीप मोरे यांच्या घरासमोर आले व त्यांनी शिवीगाळ करत तसेच टिळकनगरहून आलेल्या उदावंत बर्डे याने हातातील कत्तीने हाताला, कोपरावर, पाठीवर मारून जखमी केले. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात संदीप मोरे यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी उदावंत बर्डे, जालू पवार, संदीप पवार व इतर १०-१५ अनोळखी इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसरी फिर्याद संदीप रविंद्र पवार, वय-१९, रा. भामाठाण याने दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दुसऱ्या फिर्यादीत दुपारच्या वेळेस संदीप पवार हा नदीच्या कडेला कामाला गेल्यावर आपले कपडे काढून ठेवले होते. मात्र, तेथे ते नंतर दिसाले नाही. तेव्हा आपण रोहित मोरे व बादल मोरे यांना माझे कपडे तुम्ही घेतले काय? असे विचारले तेव्हा ते नाही म्हणाले.

तेव्हा संदीप पवार यांनी त्यांना शिवीगाळ केली. रात्री ग्रामपंचायतीच्या जवळ असलेल्या मंदिरासमोर संदीप पवार हे असताना तेथे रोहीत मोरे हा आला व मी तुझे कपडे घेतले नाही तरी तू माझे नाव घेतो, तसेच संदीप मोरे याने त्याच्या हातातील रॉड आणून तो संदीप पवार यांच्या डोक्यात मारला.

त्यामुळे लोकांनी हे भांडण सोडवले. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात संदीप पवार याने फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी रोहीत मोरे, संदीप मोरे, माधव मोरे यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. वरील दोन्ही प्रकरणांचा पुढील तपास श्रीरामपूर तालुका पोलीस करीत आहेत.

# देवगाव परिसरात बिबट्याचा धुमाकूळ

## दहा दिवसांत १५ शेळ्यांचा फाडशा ; एकुण ११ बिबट्यांचा संचार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा फाटा** : नेवासा तालुक्यातील देवगाव परिसरात बिबट्याने धुमाकूळ घातला असून, एकाच आठवड्यात हल्ल्यांमध्ये १५ शेळ्या व बोकडाचा मृत्यू झाला आहे. गोठ्यांनवर होणाऱ्या हल्यानमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. वन विभागाने त्वरित कारवाई करून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी होत आहे. मागील बरोबर एक वर्षांपूर्वी देवगाव भेंडा शिवारातील बाळासाहेब वाघ यांच्या शेतात एक नर मादी व चार बछडे असल्याचे शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष बघितले होते.



त्यानंतर याबाबत वन विभागाला माहिती दिल्यावर वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात एक पाच महिन्याचा बछडा अडकला होता. तेव्हापासून या भागात पाच बिबट्यांच्या टोळीचा मुक्त संचार होत असलेला अनेक शेतकऱ्यांनी बघितला होता यापूर्वी अनेक शेतकऱ्यांची कुत्री बोकड शेळ्या वासरांनवर या बिबट्यांनी हल्ले करून उसामध्ये नेऊन फस्त केले आहे.

मात्र सोमवार (दि.२०) रोजी रात्री बाळासाहेब वाघ यांच्या वस्ती पासून काही अंतरावर असलेल्या बबन जामदार यांच्या गोठ्यातील सहा शेळ्यांवर बिबट्याने हल्ला चढवत शेळ्या ठार केल्या आहेत. यापूर्वी देखील जामदार यांच्या एक एक करून जवळपास पाच शेळ्या बिबट्याने केळीच्या शेतात नेल्या होत्या मात्र यावेळी राहिलेल्या सर्व शेळ्यांच्या नरडीला चावा घेऊन ठार केल्या आहेत. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पाहणी करून सदर शेळ्या बिबट्याच्या हल्ल्यातच ठार झाल्या का? याची खात्री करून पंचनामा केला आहे. तसेच मागील पाच दिवसांपूर्वी देवगाव रांजणगाव शिवारात असलेल्या दगडु मोरे यांच्या गोठ्यातील एकाच वेळी पाच शेळ्या बिबट्यांनी उसात नेऊन ठार केल्या होत्या तसेच चार दिवस अगोदर देखील मोरे यांच्या तीन शेळ्या ठार केल्या होत्या.

त्या अगोदर मोरे यांच्या वस्तीजवळ असलेले सुखदेव धेडगे यांच्या वस्तीवरून रात्री आठ वाजता त्यांच्या समक्ष दोन बिबट्याने बोकड नरडीला धरूर ओढत नेल्याचं बघितलं त्याचवेळी गावाच्या दुसऱ्या बाजूला सुभाष निकम यांच्या अंगणातील कुत्रा बिबट्याने पकडला देवगाव परिसरात बिबट्याच्या दोन टोळ्या असून एका टोळीत नर मादी तीन बछडे तर एका टोळीत नर-मादी आणि चार बछडे असे ११ बिबट्यांचा मुक्त संचार असल्याचे अनेकांनी पाहिलं आहे. यापूर्वी देवगाव परिसरातून जवळपास पाच बिबटे जेरबंद करण्यात आले आहेत. मात्र आता पुन्हा बिबट्याचा मोठ्या प्रमाणात धुमाकूळ सुरू असल्याने वनविभागाने वेगवेगळ्या ठिकाणी तीन चार पिंजरे लावण्याची मागणी केली आहे.